संस्कार
कथामाला
२

# सोनेरी प्रभात




BVBK-0403002

डॉ. कृ. पं.
देशपांडे

3002
ज्ञानेश्वर

3002 ज्ञानेश्वर
बी-बा.

BVBK-0403002

संस्कार कथामाला भाग - २

# सोनेरी प्रभात

डॉ. कृ. पं. देशपांडे
एम्.बी.एड्., पी.एच्.डी

मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ
पुणे ४११ ०३०

सोनेरी प्रभात (संस्कार कथामाला भाग - २)

प्रकाशिका : सौ. मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ पुणे ४११ ०३०

© डॉ. कृ. पं. देशपांडे
'सुरभि' १३५/१२ब प्रभा सोसायटी
भवानी मंदिराजवळ, पौड रस्ता,
कोथरूड, पुणे - ४११ ०२९

प्रकाशन दिनांक : **१४ जानेवारी १९९४ (मकरसंक्रांत)**
**प्रकाशन क्रमांक :** ६४०
**ISBN : 81-85773-62-9**

मुद्रक : श्री. प्रमोद बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

टाईपसेटींग: ला प्रिंट
१०२५/ब, सदाशिव पेठ
पुणे - ४११ ०३०

मुखपृष्ठ : श्री. अनिल उपळेकर

आतील चित्रे : श्री. अशोक बोकील

मूल्य : रुपये तीस मात्र

# प्रास्ताविक

'संस्कार कथामाला' ही पाच पुस्तकांची मालिका रसिक कुमार वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. आज आपल्या अवती भवती पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, नीतिमूल्यांची घसरण ! विविध क्षेत्रांतील समाजधुरीण आज पुन्हा पुन्हा हेच सांगत आहेत. आमच्या पुढचे आदर्शच ढासळले आहेत. वर्तमान काळात आदर्शांचा अभाव निर्माण झाला की भूतकाळ शोधावा लागतो. त्या दृष्टीने भारताच्या इतिहासाकडे पाहिले, संस्कृतीकडं दृष्टिक्षेप टाकला की अनेक गुणांचे उत्तुंग आदर्श डोळ्यांसमोर उभे राहतात. सद्यःस्थितीत त्यांच्याकडून अनेक गुण शिकता येतील. त्या गुणांची जोपासना करणे आज नितांत आवश्यक बनले आहे. त्यातूनच भावी पिढी घडेल. देशाला आवश्यक असणारे निष्ठावान, चारित्र्यवान, गुणी लोक लाभू शकतील. देशभक्त, समाजसुधारक निर्माण होऊ शकतील. असे

सोनेरी प्रभात (संस्कार कथामाला भाग - २)

प्रकाशिका : सौ. मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ पुणे ४११ ०३०

© डॉ. कृ. पं. देशपांडे
'सुरभि' १३५/१२ब प्रभा सोसायटी
भवानी मंदिराजवळ, पौड रस्ता,
कोथरूड, पुणे - ४११ ०२९

प्रकाशन दिनांक : **१४ जानेवारी १९९४ (मकरसंक्रांत)**
**प्रकाशन क्रमांक :** ६४०
**ISBN : 81-85773-62-9**

मुद्रक : श्री. प्रमोद बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

टाईपसेटींग: ला प्रिंट
१०२५/ब, सदाशिव पेठ
पुणे - ४११ ०३०

मुखपृष्ठ : श्री. अनिल उपळेकर

आतील चित्रे : श्री. अशोक बोकील

मूल्य : रुपये तीस मात्र

# प्रास्ताविक

'संस्कार कथामाला' ही पाच पुस्तकांची मालिका रसिक कुमार वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. आज आपल्या अवती भवती पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, नीतिमूल्यांची घसरण ! विविध क्षेत्रांतील समाजधुरीण आज पुन्हा पुन्हा हेच सांगत आहेत. आमच्या पुढचे आदर्शच ढासळले आहेत. वर्तमान काळात आदर्शांचा अभाव निर्माण झाला की भूतकाळ शोधावा लागतो. त्या दृष्टीने भारताच्या इतिहासाकडे पाहिले, संस्कृतीकडं दृष्टिक्षेप टाकला की अनेक गुणांचे उत्तुंग आदर्श डोळ्यांसमोर उभे राहतात. सद्यःस्थितीत त्यांच्याकडून अनेक गुण शिकता येतील. त्या गुणांची जोपासना करणे आज नितांत आवश्यक बनले आहे. त्यातूनच भावी पिढी घडेल. देशाला आवश्यक असणारे निष्ठावान, चारित्र्यवान, गुणी लोक लाभू शकतील. देशभक्त, समाजसुधारक निर्माण होऊ शकतील. असे

सोनेरी प्रभात (संस्कार कथामाला भाग - २)

प्रकाशिका : सौ. मधुमिता राजीव बर्वे
मधुराज पब्लिकेशन्स् प्रा. लि.
२५१ क शनिवार पेठ पुणे ४११ ०३०

© डॉ. कृ. पं. देशपांडे
'सुरभि' १३५/१२ब प्रभा सोसायटी
भवानी मंदिराजवळ, पौड रस्ता,
कोथरूड, पुणे - ४११ ०२९

प्रकाशन दिनांक : **१४ जानेवारी १९९४ (मकरसंक्रांत)**
**प्रकाशन क्रमांक :** ६४०
**ISBN : 81-85773-62-9**

मुद्रक : श्री. प्रमोद बापट
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

टाईपसेटींग: ला प्रिंट
१०२५/ब, सदाशिव पेठ
पुणे - ४११ ०३०

मुखपृष्ठ : श्री. अनिल उपळेकर

आतील चित्रे : श्री. अशोक बोकील

मूल्य : रुपये तीस मात्र

# प्रास्ताविक

'संस्कार कथामाला' ही पाच पुस्तकांची मालिका रसिक कुमार वाचकांच्या हाती देताना मला आनंद होत आहे. आज आपल्या अवती भवती पाहताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती म्हणजे, नीतिमूल्यांची घसरण ! विविध क्षेत्रांतील समाजधुरीण आज पुन्हा पुन्हा हेच सांगत आहेत. आमच्या पुढचे आदर्शच ढासळले आहेत. वर्तमान काळात आदर्शांचा अभाव निर्माण झाला की भूतकाळ शोधावा लागतो. त्या दृष्टीने भारताच्या इतिहासाकडे पाहिले, संस्कृतीकडं दृष्टिक्षेप टाकला की अनेक गुणांचे उत्तुंग आदर्श डोळ्यांसमोर उभे राहतात. सद्य:स्थितीत त्यांच्याकडून अनेक गुण शिकता येतील. त्या गुणांची जोपासना करणे आज नितांत आवश्यक बनले आहे. त्यातूनच भावी पिढी घडेल. देशाला आवश्यक असणारे निष्ठावान, चारित्र्यवान, गुणी लोक लाभू शकतील. देशभक्त, समाजसुधारक निर्माण होऊ शकतील. असे

लोक भावी पिढीतून निर्माण व्हावेत आणि त्यांनी भारताला जगात मानाचे स्थान मिळवून द्यावे यासाठी हा अल्पसा प्रयत्न ! मालिकेचा प्रपंचही त्याचसाठी !!

'सोनेरी प्रभात' या पुस्तकात संस्कारक्षम अशा पाच कथांचा समावेश केला आहे. 'सोनेरी प्रभात' या पहिल्या कथेत वाल्मीकीची कथा आहे. तपस्येमुळे महानपदही मिळू शकते. कोणतेही ध्येय गाठण्यासाठी तप आवश्यकच आहे. दुसरी कथा आहे पुरूची. त्याच्या मातृपितृ-भक्तीची, आज्ञापालनाची ही कथा त्याच्या शौर्याचाही पदर सांगून जाते. 'अमृतसिंचन' ही कथा राजा गोपीचंदाची आहे. मनाच्या शुद्धतेत, पावित्र्यात अडथळा आणणाऱ्या विकारांना ज्ञात्यांनी शत्रू मानलेले आहे. मद किंवा उन्मत्तपणा हा त्यातलाच एक विकार. त्याच्यामुळे कसा अनर्थ ओढवतो हे सांगून तो टाळण्याकडे संकेत करणारी ही कथा आहे. 'प्रायाश्चित्त' ही माधवराव पेशव्यांच्या जीवनातील एक घटना. प्रजाहित दक्षता, शौर्य, मानवता आदी गुणांवर प्रकाश टाकणारी आहे. आणि पाचवी कथा आहे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांची. विद्याव्रत आणि ते ध्येय गाठण्यासाठी त्यांनी केलेल्या परिश्रमांची ! अशा विविध गुणांचा आदर्श कुमारांसमोर ठेवणाऱ्या या कथा आहेत.

एखादी मालिका सुबक आणि सुरेख प्रकाशित

करणे हे आजच्या काळात खरंच अवघड आहे. ही मालिका-प्रकाशनाची जबाबदारी दिलीपराज प्रकाशनचे श्री बर्वे यांनी स्वीकारली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. पुस्तकाला रंग-रूप देणाऱ्या चित्रकार, मुद्रक यांचाही मी आभारी आहे.

माझ्या आजपर्यंतच्या लेखनाचे वाचकांनी ज्या प्रेमाने स्वागत केले त्याचप्रमाणे याही मालिकेचे स्वागत होईल असा विश्वास वाटतो.

कृ. प. देशपांडे

'सुरभि'
१३५/१२ ब प्रभा को. हौ. सोसा.
भवानी मंदिराजवळ, पौड रस्ता
कोथरूड, पुणे ४११०२९

## क्रमदर्शिका


| | | |
|---|---|---|
| १) | सोनेरी प्रभात | ५ |
| २) | सुगंध निर्माल्याचा | २२ |
| ३) | अमृतसिंचन | ४७ |
| ४) | प्रायश्चित्त | ६३ |
| ५) | विद्याव्रती | ८४ |

३००८२ १०।८।८
लो. वा.

# सोनेरी प्रभात

घनदाट अरण्य होते. झाडे आकाशापर्यंत भिडली होती. भर दुपारीही सूर्याची किरणे खाली येऊ शकत नव्हती. वाऱ्याला सुद्धा मोकळेपणाने वाहता येत नव्हते. क्रूर श्वापदांची वस्तीही होती. दिवसा देखील त्यांचे आवाज जंगलात घुमायचे. एकट्या-दुकट्यालाच काय पाच-सहा जणांना दिवसाही जायला भीती वाटावी असे अरण्य होते. अरण्य कसले जणू मृत्यूचे दारच !

अशा या जंगलात काही झोपड्या होत्या. तेथे भिल्लांची वस्ती होती. दऱ्या-डोंगरासारखेच आडदांड आणि राकट ! ओरडले तर जंगली श्वापदांसारखा आवाज घुमायचा. त्यांचा रागीट चेहरा पाहिला की घाम फुटायचा ! इतके क्रूर !!

झोपडीजवळून जाणारी वाट दोन मोठ्या नगरांना जोडणारी होती. माणसांच्या मनात असो

अथवा नसो, दुसऱ्या नगराला जायचे म्हणजे त्या वाटेने जावेच लागे. हे भिल्ल त्या वाटेवर दबा धरून बसायचे. लूटमार करून, त्यावर गुजराण करायची, हाच त्यांचा व्यवसाय !

या वस्तीत एक भिल्ल रहात होता. वाल्ह्या त्याचे नाव ! रानटी, क्रूर, अंगाने आडदांड. जणू मृत्यूचाच अवतार. जंगलातून जाणारांना त्याची भीतीच वाटायची. एकटं-दुकटं कोणी तिकडे फिरकायचंच नाही. रोज लूटमार करावी आणि सूर्यास्तानंतर पापांचे ओझे घेऊन घरी यावे, हाच दिनक्रम.

अशीच एक संध्याकाळ. वाल्ह्या वाटसरूंची वाट पाहून थकला होता. गेले दोन-चार दिवस त्या वाटेवर कोणी आलेच नव्हते. आजही झोळी रीतीच होती. तसेच परत जावे लागणार होते.

रोज बायकोची तरी समजूत काय घालणार ? आजपर्यंत तिने ऐकले होते पण येतानाच बजावले होते, ''आज तसंच आलात तर त्वांड पान्हार नाय.'' वाल्ह्याला ते शब्द, तिची ती क्रुद्ध मद्रा आठवत होती. म्हणून सूर्यास्तानंतरही काही काळ तो वाट पहात बसला होता. आता अंधार दाटत चालला होता. मनही अंधारले होते. तशाच रिकाम्या झोळीने, रिकाम्या मनाने आणि अंधारलेल्या अंतःकरणाने त्याने घरची वाट धरली. बायको, पोरे झोपडी बाहेरच होती.

वाल्ह्या येताच त्याच्या मुलांची नजर त्याच्याकडे गेली. ती आनंदाने नाचू लागली. पण वाल्ह्याची चाल मंद झाली होती. तो काही अंतरावरच उभा होता. बोलण्याचा तो काहीच प्रयत्न करत नव्हता. त्याच्या बायकोने ते पाहिले. सारे ओळखले. ती संतापली. वीज कडाडावी तशी ती बोलायला लागली.

''काय, आजबी हात हालवीत आला जनू ?''

वाल्ह्या शांत उभा होता. मुद्रा म्लान होती. मस्तक झुकलेले होते.

''काय, कुनाशी बोलत्येय मी ? आज सांगितलं व्हतं नव्हं, की, काय आनलं नाय तर त्वांडबी पान्हार नाय म्हनून.....''

''अग पन माझं ऐकशीला का नाय ?''

''काय बी सांगू नगा. रोज त्येच ऐकून कान किटलं माझं, या प्वारांच्याकडं बघा. मघाधरनं वाट पाहत्यात. त्यांना काय सांगू ?'' तुमचा बा आजबी तसाच आला म्हणू ?''

''पन् आज कोनीबी रस्त्याला आलाच नाय नग ''

''मला कायबी ऐकायचं नाय. पैसं आनल तर घरला या. नाय तर नाय आलास तरी चालंल. काय

तुमच्यावाचून आमचं आडायचं नाय. समजला. पैसा आणला तर ठीक, नाय तर मरा जावा. मला कायबी वाटायचं नाय.''

वाल्ह्याच्या बायकोने आपल्या पोरांना ओढून घेतले. एकजण त्याच्या कमरेला विळखा घालून उभा होता. त्याला खसकन् ओढले आणि त्राग्याने, संतापाने साऱ्यांना ओढत नेऊन झोपडीत आपटले. त्यांची केंकाटणी सुरू झाली. ती तशीच दाराशी आली. झोपडीचे दार धाडकन लावले. क्षणभर आवाज झाला नंतर सारेच शांत झाले. वाल्ह्या या साऱ्या गोष्टी पहात त्या भयाण अंधारात, खिन्न मनाने एकटाच उभा होता.

आपल्या पत्नीचे वर्तन पाहून तो थक्क झाला. पिंजारलेल्या केसात हात फिरवत असताना विचारांचा वेग वाढला होता. 'ही आपली पत्नी का ?' हा विचार त्याला अस्वस्थ करीत होता.

''आजपर्यंत मी यांच्यावर प्रेम केलं. रात्रंदिवस यांच्यासाठी कष्ट केले. कित्येकदा माझ्या जीवावर बेतले तरी फिकीर केली नाही. असे असताना दोन-चार दिवस लूट मिळाली नाही तर हे रागवतात ! पैशाशिवाय घरी येऊ नका असं सांगतात. पैशाशिवाय यांचं प्रेम कोणावरतीच दिसत नाही. हं.... शेवटी आपल्यासाठी प्राणी जगत असतो. आपल्या सुखासाठी त्याची धडपड चालू असते. दुसऱ्याच्या मनाचा विचार

करायला त्याला सवड असते कोठे ? 'मी' या शब्दाभोवती त्याच्या साऱ्या कल्पना फिरत असतात हेच खरे.

हे धन आणण्यासाठी माझ्या हातून किती पापे होतात याचे त्यांना भान तरी आहे का ? मी आणलेल्या मत्तेवर सत्ता मात्र त्यांची ! छे .... सारे सोडून द्यावे अन् ....''

वाल्ह्याच्या विचाराचा ओघ आणखी वाढला असता. पण झोपडीतली पोरं केविलवाणी रडत होती. त्यांना 'भूक' लागली होती. बायको कैदाशिणीसारखी ओरडत होती. त्या भयाण रात्री तिचा कर्कश आवाज अधिकच कर्कश वाटत होता. माराने सुद्धा पोरे थांबत नव्हती. त्यांची समजूत पटत नव्हती.

वाल्ह्याने दीन मुद्रेने झोपडीकडे पाहिले, ''माझ्या विचारांचा अन् या पोरांचा काय संबंध ? त्यांनी भूक लागली की काय करायचे ? ही माझी पोरं आहेत. आणि बायकोचे तरी काय चुकले ? मीच काही आणले नाही तर ती तरी काय करणार ? पोरांना काय खायला घालणार ? मला परत जंगलात गेलं पाहिजे. यांच्यासाठी धन मिळविले पाहिजे. लूट केली पाहिजे. कसलं पाप नि कसलं पुण्य ? सारे शब्दांचे खेळ. मला आणि माझ्या बायका-पोरांना जगायचे असेल तर मला ही लूटमार करायलाच हवी ... ही पापं करायला

हवीत.....''

वाल्ह्याचा निश्चय ठरला. हातातील शस्त्रांना एकदा त्याने जोखले. भोवतालच्या अंधारातही त्याचं मन निश्चयाच्या प्रकाशानं उजळलं होतं. तो घरात आला. बायकोला सांगितलं.

''काय काळजी करू नगस. मी आता परत जातो. येळ आल्यास मुडद्यांचा ढीग करीन पन् उद्या पैसा घेतल्याबिगर परत न्हाय येणार.''

झोपडीतल्या अंधुक प्रकाशातही बायकोच्या चेहऱ्यावरचा आनंद त्याला दिसला. तिने पोरांना प्रेमाने जवळ ओढले. जणू पैशाने प्रेमालाही नवे अंकुर फुटतात.

निश्चयाने निघालेला वाल्ह्या अरण्यात आला.

रात्र सरली होती. प्रकाश वाढत होता. शस्त्रास्त्रं परजली होती. वाल्ह्या दबा धरून बसला होता. बराच वेळ गेला. आणि अचानक पाचोळा चुरचुरला.

वाल्ह्याचे कान वेध घेऊ लागले. दबलेल्या पावलांचा आवाज वाढत होता. आपापसांतलं कुजबुजणं कानी येत होतं. वाल्ह्याने स्वतःला सावरले होते. त्याची फरशी सज्ज झाली होती.

कोणी दोन वाटसरू पलिकडच्या नगरात निघाले

होते. हे जंगल वाल्ह्याचे हे त्यांना माहीत होते पण ''इतक्या सकाळीच तो कशाला येईल येथे ? तो यायच्या आत आपण निघून जाऊ.'' असा विचार करून ते रस्ता कापीत होते. हे खरे असले तरी मनात भीती होतीच. पावलं दबकत होती ती त्यांचमुळे. तो केव्हा अन् कोठे येईल, याचा नेम नव्हता. घाबरत, जीव मुठीत धरून ते जात होते. तोच.

''थांबा.....'' वाल्ह्याचा कठोर शब्द कानी आला. तो फरशी घेऊन पुढे आला. त्याचे ते भयाण रूप पाहून वाटसरू गर्भगळित झाले. थरथर कापू लागले. पायांची उगाच हालचाल होऊ लागली. तोंडाला कोरड पडली. तोंडातून शब्द फुटेना. तोच वाल्ह्या पुन्हा ओरडला,

''खबरदार, येक पाऊलही पुढे टाकाल तर दोन तुकडे होतील. बोला... धन कुठं ठेवलाय... काढा सारं....''

''नाही रे बाबाऽऽ ....''

''काय ख्वाटं बोलता.... काढा सारं धन....''

''अरे, हे थोडंसं द्रव्य .... या समोरच्या नगरात दुसऱ्याला द्यायचं आहे. आमचं नाही रे हे ....''

''हाऽऽहा... या थ्वाडं का हुईना धन हाय ना ... मग द्या सगळं....''

''अरे... पण ....''

''देता का नाय ?''

वाल्ह्याने फरशी उगारली. काय करावे हे त्यांना कळेना .... क्षण ... दोन क्षण ... एक क्षण युगासारखा वाटत होता. धनाच्या गाठोडीचा हात पुढे मागे होत होता. ''दुसऱ्याचे धन... द्यावे का नाही ? जिवावर बेतलं आहे. द्यावं धन आणि जीव वाचवावा का ?'' निश्चय होत नव्हता. वाल्ह्याने पुन्हा दरडावले.

''अरं ... अजुन नाय देत ... द्या समदं धन ...'' त्याचा आवाज मृत्युघंटेसारखा होता. वाल्ह्याने एक क्षणभर वाट पाहिली आणि काही कळायच्या आत एकेका वाराने दोघांची मुंडकी धडावेगळी केली.

दोघेजण रक्ताच्या थारोळ्यात पडले. वाल्ह्याने पैशाची थैली घेतली. आपल्या कंबरेला बांधली. ते मुडदे फरफरा ओढीत दूर नेले आणि जंगलात भिरकावून दिले. पुन्हा जाग्यावर आला. रक्ताळलेली फरशी खांद्यावर टाकली. आजची सकाळ चांगली गेली होती. कदाचित आणखीही शिकार येईल असा विचार करून तो पुन्हा दबा धरून बसला. पुन्हा प्रतीक्षा. पुन्हा पाप आणि कदाचित पुन्हा पैसा ... चक्र फिरत होतं. कालचक्रासारखं !

दुपार सरत आली होती. वाल्ह्याला नवीन

शिकार मिळाली नव्हती. 'आता परत जावे की काय?' या विचारात तो असताना वीणेचा मंजुळ आवाज त्याच्या कानावर आला. त्या क्रौर्याला बरं वाटलं पण क्षणभरच ! वाल्ह्याच्या भक्तिवीणेच्या तारा अजून जुळल्या नव्हत्या. म्हणूनच हृदय-वीणेतून सुस्वर उमटत नव्हते.

वाल्ह्याने फरशीच्या पात्यासारखी आपली तीक्ष्ण नजर इकडे तिकडे फिरवली. दूर अंतरावरून एक मुनी येताना त्याने पाहिले. एका हातात चिपळ्या, गळ्यात वीणा. पीतवस्त्र नेसलेले. गळ्यात, हातात, डोक्यावर सतेज फुलांच्या माळा, तेजस्वी कांती. वीणेच्या मंजुळ



आवाजात नामस्मरण चाललेले. जंगलातली झाडेही त्याने मोहित झाली आहेत असे त्याला वाटले. ते दिव्य रूप पाहून तोही क्षणभर विस्मयचकित झाला. दिपून गेला.

दुसऱ्याच क्षणी तो भानावर आला. 'आपल्याला भिऊन एखाद्याने हे रूप घेतले असावे' अशी शंका त्याच्या मनाला चाटून गेली. "'छे, कोणीही असले तरी काय करायचे आहे ? आपल्याला पैका मिळाल्याशी कारण !'' हा विचार दृढ झाला. तो पुढे आला. फरशी हातात तोलून धरली. एव्हाना नारद त्याच्याजवळ आले होते. त्याने नारदांना नखशिखांत न्याहाळले पण पुढे जाण्याचे धाडस होईना. दिव्यत्वाला स्पर्श करायला पापी माणसांना भीती वाटते. बऱ्याच वेळा तो मागे सरला आणि पुन्हा एकदा निश्चय करून, धिटाईने पुढे गेला. नेहमीच्या क्रूर आणि रूक्ष आवाजात त्याने विचारले,

''काय रे गोसावड्या, तुझं नाव काय ? देवाचं नाव घेऊन मला फसवतोस काय ? सांग .... नाव काय तुझं ? आणि ऱ्हातोस तरी कुठं ?''

''माझं नाव होय ? ... माझं नाव नारद .... आणि मी रहातो कुठे विचारशील, तर मी काय एका ठिकाणी असतो होय ? अरे या साऱ्या त्रिभुवनात माझा संचार आहे. हे सारे विश्वच माझे गाव आहे.''

''मला फसवतोस होय. सगळीकडे तू हिंडतोस ना ?''

''मग तुझ्याकडे धनबी बरंच असल. दाखव मला सगळं धन आन् टाक माझ्या झोळीत.....''

''धन म्हणशील तर माझ्याकडे काही नाही बघ. आम्हाला धन काय करायचंय ? हां ... एक धन आहे....''

''आहे ना ... दाखव .... दाखव लौकर''

''अरे ते दाखवता येणारं नाही. माझ्याजवळचं धन म्हणजे परमेश्वराचे नामस्मरण ते कोणाला लुटताही येणार नाही.''

''ए गोसावड्या, काय वाटेल ते सागू नगस. मला सारं माहिती होय. मी एकदाच तुला इचारतो. धन दाखव आन् मला घेतोस काय नाय ते सांग.''

''अरे खरंच माझ्याजवळ प्रभू नामाशिवाय कोणतेही धन नाही.''

''मरावं लागंल. ही फरशी पाहिली का ? घेतो तुला घेवाकडं पाठवून.''

''अरे, शिकाऱ्या थांब....थांब जरा....''

नारदांनी धीटपणे त्याला सांगितले. त्यांची शांत मनोवृत्ती, दिव्य तेज पाहून त्याचा हात नकळत खाली

गेला. तो तसाच उभा राहिला आहे असे पाहून नारद म्हणाले,

"हे शिकाऱ्या, तूच विचार कर, हे पाप तू का करतोस ? कोणासाठी ? आणि हे पाप करून तुला काय परमेश्वर प्राप्ती होईल काय ? सांग ...."

"हे बघ, ह्ये तुझं पुराण मला कायबी समजत नाय. मला पापबीप काय माहीत नाय. माझ्या बायकापोरांसाठी पैका लागतो त्यो मी मिळवतो. बाकी मला काय माहीत नाय."

"ठीक आहे. तुझ्या बायकापोरांसाठी तू हे सारं धन मिळवतो ना ?"

"व्हय...."

"मग मला सांग, पैसा आणल्यावर तुझी बायका-पोरं जशी तुझ्या भोवती भोवती नाचतात, तशी पैसा नसल्यावर नाचतात का ? धन असताना तुझी बायको जशी तुझ्याशी प्रेमाने वागते, तसंच पैसा नसताना वागते का ? त्यावेळी ती माया, ते प्रेम तसंच असतं का ? त्यांच्यासाठी तू हे सारं पाप करतोस ना मग या पापाचे वाटेकरी ते होतील का ? या तुझ्या दुःखात ते सारे सहभागी होतील का ? सांग ! याचा विचार तू कधी केला आहेस का .... बघ विचार कर !!"

नारदांच्या प्रश्नांनी वाल्ह्या चक्रावला. मनातील पापी विचारांची धूळ खाली बसू लागली. मनाचं पात्र स्वच्छ होऊ लागलं. विकार जळू लागले. सदसद्विवेकबुद्धी जागृत झाली आणि वाल्ह्या क्षणभर विचारक्रांत बनला.

"खरंच, हा मुनी म्हणतो त्यात खोटं काय आहे? अशाच एका सायंकाळी रित्या झोळीनं मी घरी गेलो होतो. ऐकले होते वाक्बाण ! मनाला जाळणारे. पोळणारे !! पैसा नसताना मला कोणी सहानुभूतीही दाखविली नव्हती मग प्रेम कोठले ? आणि हे स्वार्थी लोक पापात वाटेकरी कसे होतील ? स्वार्थासाठी जे केलं जातं ते प्रेम कसलं ? ते ढोंग असतं. सारे सुखाचे सोबती असतात. आणि दुःखात ? ... दुःखात मी एकटा ! एकाकी .... !! आणि त्यावेळी मला आधार.... ? मला आधार ..... ? परमेश्वर .... खरेच परमेश्वर ! आता एवढी पापं केल्यावर तो कसा भेटणार ? तो आनंदघन जोडण्यासाठी हे मायापाश तोडलेच पाहिजेत. त्यालाच शरण गेलं पाहिजे. यांचा उपदेश ऐकला पाहिजे."

मन निर्मळ झाले होते. शुद्ध आत्म्याचे प्रतिबिंब त्यात उमटू लागले होते. तो खिन्न झाला. पश्चात्तापदग्ध झाला. हातातली फरशी दूर फेकून दिली. नारदांच्या चेहऱ्यावर मंद स्मित उमटले. वाल्ह्या

दोन पावलं जवळ गेला. निमिषातच तो खाली बसला. क्रूरता नमली. नारदांच्या पायाला त्याने मिठी मारली. डोळ्यांतून घळघळ-घळघळ अश्रू वाहू लागले. जणु आजवरचे पाप त्या अश्रू प्रवाहातून वाहून जात होते. त्याचा भावनावेग कमी झाला. नारदांनी त्याच्या हाताला धरून उठवले. खालच्या मानेनेच वाल्ह्या त्यांना म्हणाला,

''मुनीवरा, माझ्या हातून लई अपराध झाले आहेत. याची आठवण झाली की, मन पेटून जाते. आता मातर मी तुम्हाला शरण आलो हाय. तुम्हीच या पापातून माझी सुटका करा.''

''शांत हो वाल्ह्या....''

''म्हाराज, तुम्ही मघाशी म्हणालात त्ये सारं खरं हाय. पैसा नसेल तर बायका पोरे कोण इचारीत नाहीत. त्ये पापांचे वाटे कसं घ्येणार ? मलाही हे सारं समजले हाय. तुमच्या रूपाने मला द्येवच भेटला. माझं भाग्य उजळलं. आता तुम्हीच सांगा की काय करू ? आता मी घरी जाणार नाय. त्यांची त्वांड बी पहाणार नाय सांगा.... सांगा मी काय करू ?''

''वाल्ह्या, तुला तुझ्या गतकर्मांचा पश्चात्ताप झाला आहे. पश्चात्तापाने माणूस शुद्ध होतो. आणि शुद्ध अंतःकरणाने परमेश्वराला शरण गेले की परमेश्वर

दूर नसतो.''

''मुनीवरा, तुमचे शब्द ऐकून मला बरं वाटलं· आता मी काय करू ते सांगा.''

''वाल्ह्या, या तुझ्या झोपडीपासून दूर जा. प्रभू रामचंद्राचे नामस्मरण कर. तुझी तपश्चर्या पूर्ण झाली की पुढे काय करायचे हे मी नंतर सांगेन. तोपर्यंत ''राम....राम....राम....''असे म्हणत तू एकाग्र चित्ताने तपश्चर्या कर. तपश्चर्येने माणूस शुद्ध बनतो.''

वाल्ह्याने नारदांना साष्टांग नमस्कार घातला. नारदांनी त्याला आशीर्वाद दिला. त्याला उठवले. आपल्याबरोबर दूर अरण्यात घेऊन गेले. पानांनी डवरलेल्या एका वृक्षाखाली त्याला पद्मासन घालून बसायला सांगितले. नामस्मरणाची आज्ञा केली आणि 'मी पुन्हा येईपर्यंत अखंड नामस्मरण कर' असे सांगून नारद ब्रह्मविणेच्या मंजुळ आवाजात नामस्मरण करीत निघून गेले. वाल्ह्याने प्रभू रामचंद्राचे नामस्मरण करायला सुरुवात केली.

ऋतूमागून ऋतू संपले. कालचक्र पुढे जात होते. वाल्ह्याचे नामस्मरण अखंड चालू होते. मुखावर तपश्चर्येचे दिव्य तेज झळाळू लागले. त्या अरण्याला नामस्मरणाने पवित्रता आली होती. झाडांचे हलणे, पानांचे सळसळणे नामस्मरणाच्या लयीवर होत होते.

केवळ वाल्ह्याच रामरंगी रंगला होता असे नाही तर भोवतालचा परिसरही राममय झाला होता.

सकाळची वेळ. सूर्य आपल्या सोनेरी किरणांनी जगाला उजळत होता. नारदांची स्वारी नामस्मरण करीत भ्रमण करीत होती. आज अचानक ते या जंगलात आले होते. तेथील वातावरण पाहिल्यावर त्यांना आनंद झाला. आणखी जवळ गेल्यावर 'रामऽराम' असे शब्द त्यांच्या कानावर पडले. शब्द कोठून येत आहेत याचा ते शोध घेऊ लागले.

शोधता शोधता एका वारुळातून ते शब्द येत आहेत हे त्यांना जाणवले. जवळ जाताच त्यांच्या डोळ्यांसमोर गतेतिहास तरळून गेला. त्यांनी वारूळ उकरून बाजूला केले. आत एक तेज:पुंज ऋषी तयार झाला होता. नारद म्हणाले,

''वाल्ह्या ऊठ. आज तू पावन झालास. एकाग्र मनाने इतकी वर्षं तपश्चर्या केल्याने तुझी पापे नाहीशी झाली आहेत. तू आता श्रेष्ठ ऋषी झाला आहेस. या तुझ्या तपश्चर्येच्या योगाने तुला दिव्य ज्ञान प्राप्त होईल. वेदादि सर्व विषयांचे ज्ञान तुझ्या ठायी निर्माण होईल. आता तू आश्रम तयार कर आणि येणाऱ्या ज्ञानेच्छू लोकांना ज्ञानदान कर. तपश्चर्या करताना तू इतका एकाग्र झाला होतास की, शरीराभोवती वारूळ वाढल्याचे भानही तुला राहिले नाही. त्या वारूळातून

तुझा पुनर्जन्म झाला म्हणून तुला सारे लोक 'वाल्मीकी' या नावाने ओळखतील.''

वाल्मीकींनी देवऋषी नारदांना साष्टांग नमस्कार घातला. नारदांनी आशीर्वाद देऊन त्याला हाताला धरून उठवले. वाल्ह्याच्या जीवनात सोनेरी प्रभात सुरू झाली होती.

※


# सुगंध निर्माल्याचा

''पुरु ऽऽ ! काय केलंस हे ऽऽ !!''आईची आर्त किंकाळी माझ्या कानावर आदळली. माझ्याही हृदयाचे ठोके चुकले. आपण काही विपरीत तर केलं नाहीना, हा विचार माझ्याही मनात येऊन गेला पण क्षणभरच ! दुसऱ्याच क्षणी ध्यानात आलं की, पित्याची आज्ञापालन करण्यासाठी आपण हे वार्धक्य समजून उमजून स्वीकारलेलं आहे. त्याचा खेद, दुःख बाळगण्याचं काहीच कारण नाही. मन शांत ठेवून आईची समजूत घातली पाहिजे. तिला धीर दिला पाहिजे.

मी तिच्याकडे तोंड वळवलं. माझे हात हातात घेऊन ती रडत होती. लहान मुलासारखी ! मी मनातलं सारं बळ एकवटलं. शब्द एकत्रित केले. तिला धीर देऊ लागलो. तिची समजूत पटत नव्हती. कशी पटणार ? उन्मळून पडलेल्या वृक्षाला मा पुन्हा स्थिर करण्याचा

प्रयत्न करीत होतो. जीवनात आत्ताच कुठे सुखाचा प्याला हाती आला असताना तो मी भिरकावून देऊन, तिला सुखी व्हायला सांगत होतो. बऱ्याच वेळानंतर तिचे अश्रू सुकले. ती थोडी शांत झाली.

मी समोर बघितलं. समोर मोठा आरसा होता. माझं प्रतिबिंब त्यात दिसत होते. वृद्धत्वाचे ते चित्र पाहून निमिषभर माझेही डोळे मिटले.



थोड्या वेळापूर्वी माझे तारुण्य अभिमानाने दाखविणारा हाचं आरसा आता माझ्या वार्धक्याला

हसत होता. मला म्हणत होता - "वेड्या, काय केलंस हे ? हे वार्धक्य घेऊन काय करणार आहेस ? वार्धक्य म्हणजे काय हे माहीत नाही तुला ?....वार्धक्य म्हणजे जीवनाचा शिशिर ! गात्रागात्रांचं चैतन्य हिरावून घेऊन आता सारं संपलं, याची भीषण जाणीव देणारा काळ ! 'लागले नेत्र रे पैल तिरी' हे पुन्हा पुन्हा सांगणारा काळ! ह्यात तुला कसलं सुख होणार आहे ?" मी त्याच्याकडे दुर्लक्ष केले. तरीही बघता बघता त्याच आरशात मला माझे मुसमुसते तारुण्य दिसायला लागले. तारुण्याने बहरलेला पुरू ! पंधराच दिवसांपूर्वी महत्त्वाकांक्षेने प्रेरीत होऊन युद्धावर निघालेला पुरु ! आणि नंतर.....सारा चित्रपट त्या आरशातून पुढे सरकू लागला.

पंधरा दिवसांपूर्वी......

हस्तिनापूरच्या युवराजांना दस्यूंनी कैद केले होते. त्यांना सोडविण्याकरिता मी माझे सैन्य घेऊन निघालो. आईचा आशीर्वाद घेतला. त्याच्या सामर्थ्याने चार दिवसांतच युवराजांना सोडविले. त्यांनी राजधानीला येण्याचा खूप आग्रह केला. युवराजांचा आग्रह ! त्याला नकार कसा देणार ?

मी आईला निरोप पाठवला. "युवराजांना मी सोडविलं." हे वाक्य मी सांगितले आणि माझे मलाच हसू आले. खरे म्हणजे, युवराजांना सोडवणारा मी

कोण ? मी तर निमित्तमात्र होतो. ज्यावेळी मी युद्ध करीत होतो, त्यावेळी ही कल्पनाही माझ्या मनाला शिवली नाही. माझ्या हातून फक्त कार्य घडत होते.

मी निरोप पुरा केला. ''युवराजांच्या बरोबर राजधानीला जात आहे. युवराजांचा नगरप्रवेश थाटात होईल. त्यावेळी त्यांना सोडविणारा वीर म्हणून मीही त्यांच्याबरोबर असेन. आपल्या मुलाचे कौतुक पाहण्यास तू जर येथे आलीस, तर मला खूप आनंद होईल.''

विजयोन्मादात रस्ता कधी संपला हे आम्हांला कळलंच नाही. हस्तिनापूर आलं. सायंकाळच्या सुमारास आम्ही नगरप्रवेश करणार होतो.

नगर शृंगारले होते. घरोघरी आनंदोत्सव चालला होता. गुढ्यातोरणे उभारली होती. कुंकवाचे सडे घातले होते. राजमार्ग सुशोभित केला होता. आम्ही रात्री नगरप्रवेश करणार म्हणून रात्रीचा अंधारसुद्धा असंख्य दिव्यांनी उजळून टाकला होता. नागरिकांच्या मनाप्रमाणे !

आम्ही नगरात प्रवेश केला, त्यावेळी संध्याकाळ टळून गेली होती. प्रजाजनांचे चेहरे आनंदाने उजळून निघाले होते. आमच्या जयजयकाराने सारे वातावरण निनादले होते. आमच्यावर पुष्पवृष्टी होत होती. विजयी

वीर म्हणून ठिकठिकाणी सुवासिनी आम्हाला ओवाळत होत्या. मिरवणूक गजगतीने राजवाड्याकडे जात होती.

समोर राजवाडा दिसू लागला. तेथील लोकांची धांदल उडून गेली होती. मी युवराजांकडे पाहिलं. त्यांच्या डोळ्यांत अधीरता होती. ओढ होती. उत्सुकता होती. डोळे काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करीत होते. माझ्या मनात आले की, त्यांना महाराणींना भेटण्याची ओढ लागली असेल. बरेच दिवस दूर असणाऱ्या कोणत्या मुलाला आपल्या आईला भेटण्याची ओढ लागत नाही ? त्यांना मातृभेटीची ओढ लागणं स्वाभाविक होते. आणि मला ? मलाही आईला भेटून बरेच दिवस झाले होते. मी युवराजांना सोडवून आणले होते. मोठा पराक्रम केला होता. या गर्दीतून उमटणाऱ्या जयध्वनीपेक्षा आईच्या कौतुकाच्या दोन शब्दांनी माझ्या अंगावर मूठभर मांस चढले असते पण .......मी विचार झटकून टाकला.

मिरवणूक राजवाड्याजवळ आली. आम्ही खाली उतरलो. युवराज लहानाहून लहान झाले होते. ताबडतोब ते महाराणींच्या महालाजवळ आले. मीही बरोबर होतो. दासी उठून उभ्या राहिल्या. त्यांनी युवराजांना सांगितले,

‘‘युवराज, आपले मातामह तपस्वी शुक्राचार्य येथे आले आहेत. त्यांना घेऊन महाराणी महाराजांच्या

दर्शनाला गेल्या आहेत.''

ते ऐकताच आमचा रथ अशोकवनाच्या रस्त्याने भरधाव धावू लागला. थोड्यांच वेळात अशोकवन आले.

भराभर पावले टाकीत आम्ही महालात प्रवेश केला. तेंथले दृश्य पाहाताच आम्ही थक्क झालो. किती आनंदाने, उत्साहाने आम्ही दोघे तेथे आलो होतो! महाराजांना पाहायला मिळेल. महाराणींना पाहायला मिळेल, त्यांच्या प्रेमसागरात तुडुंब डुंबायला मिळेल, अशी अनेक सोनेरी स्वप्ने उराशी बाळगून इथे आलो होतो.

मीही युवराज होतो, हे शर्मिष्ठा आईने मला सांगितले होते पण मला ते कोणापाशीही सांगता येत नव्हते. महाराजांनाही ते समजणार नव्हते. यदूला सोडवून आणणारा वीर म्हणून त्या दोघांनी माझे कौतुक केले असते, तरी माझे मन शांत झाले असते.

स्वप्नाच्या जगात पंख लावून विहार करीत असताना एकदम जाग यावी आणि स्वप्न विरून जावे, जागेपणाची जीवघेणी जाणीव यावी, तसे काही तरी वाटले. माणसाचे जीवन असेच असते का ? मला वाटते, माणसाला मनातल्या मनात कल्पनेच्या साम्राज्यात दंग होता येते, म्हणूनच तो जिवंत राहात

असावा. माणूस आशेवर जगतो. तीच त्याच्या जीवनात गती निर्माण करते. तीच प्रगतीचा मार्ग दाखवते पण जीवनातून ती नाहीशी झाली तर माणूस पंगू बनतो.

महालात समोरच एक मोठा आरसा होता. सोन्याने मढविलेला ! कोणीतरी एक अतिवृद्ध माणूस, आपला चेहरा झाकून, पाठमोरा उभा होता.कोण ? शुक्राचार्य असावेत ते ? पण, शुक्राचार्यांच्या अंगावर राजवस्त्रं कशी येतील ? मग ते कोण होते ? जवळच्या आसनावर महाराणी अस्फुट हुंदके देत रडत होत्या. महाराणी रडत होत्या. का ? कशाकरिता ? आणि शुक्राचार्य....? ते इथेच आले होते ना ? मग ते कोठे आहेत ?

काय प्रकार आहे काही समजतच नव्हते. जवळजवळ दोन-चार क्षण आम्ही हतबुद्ध होऊन हा प्रकार पाहात होतो. आमच्यात पुढे जाण्याची ताकद नव्हती. बोलण्याचे धैर्य नव्हते. समजावून घेण्याची उमेद नव्हती. आमच्यातली चैतन्यशक्तीच गोठली आहे, असे वाटत होते.

युवराज पुढे गेले. मागोमाग, पावलांचाही आवाज न करता, मी गेलो. युवराजांनी महाराणींना नमस्कार केला. त्यांच्या हाताचा पायाला स्पर्श होताच त्या एकदम भानावर आल्या. समोर युवराजांना

पाहाताच त्यांनी युवराजांना छातीशी कवटाळले आणि "यदूऽऽ!" एवढेच शब्द त्यांच्या तोंडातून बाहेर पडले.

नगरात आनंदोत्सव चालला असताना महाराज व महाराणी दुःखी होत्या. आम्ही दुःखी होतो. सगळं नगर प्रकाशाने उजळून निघाले असता आमची मने दुःखाने काळवंडून गेली होती.

का ? .....कशामुळे ? याची उत्तरे आम्हांला सापडत नव्हती. थोडासा दुःखावेग कमी झाल्यावर महाराणी म्हणाल्या -

"यदू ऽऽ! हे काय झालं रे !"

युवराजांना काहीच कळेना. ते म्हणाले -

"आई, काय झालं ग ? आज एवढा आनंदाचा दिवस. कोणी रंगाचा बेरंग केला ? सांग ? आज अशा मंगल प्रसंगी तुझ्या डोळ्यांत अश्रू का ? कोणतं शल्य आहे ते सांग. मी ते आत्ता नष्ट करतो."

"युवराज ही आपल्या कर्माची फळे आहेत. भोग कुणाला चुकले आहेत का ? मोठमोठ्यांना सुद्धा आपलं भवितव्य चुकवता आलं नाही, तिथे आम्ही क्षुद्र माणसे काय करणार ?"

आम्हांला काहीच कळत नव्हते. सारेच कोडे. न उलगडणारे !

''आई, झालं तरी काय ? आजोबा आले होते ना इथे ?''

''हं....! त्यामुळेच सारं घडलं.''

''म्हणजे......?''

दुःखावेगातून सावरलेल्या देवयानीने-यदूच्या आईने, सांगायला सुरुवात केली,

''युवराज'' आज सायंकाळीच बाबा इथं आले. त्यांची तपश्चर्या संपली होती. एक महान वर त्यांना मिळाला होता. किती आनंदात होते ते. लगेचच आपल्या मुलीचा संसार पाहायला ते इथं आले. इथं काय चाललं आहे हे तुला माहीत आहेच. बाबा आल्यावर मला इतका आनंद झाला त्या भरात मी माझी सगळी संसारकथा तावातावाने त्यांना सांगितली. क्षणभर मला सूडाचं समाधान मिळालं. पण यदू, सूडाचे समाधान क्षणभंगूर असते. त्या समाधानात मनाची शुचिता नसते. ते विकारीच असते हे मला आत्ता समजलं. तेव्हा मी सूडाने अंध झाले होते. माझं बोलणं ऐकताच बाबा संतापानं म्हणाले.

''कुठं आहे तो ययाती ?''

मी त्यांना इथं घेऊन आले. खरं म्हणजे आज तू नगरप्रवेश करणार होतास, इकडे यायची माझी मुळीच इच्छा नव्हती.

महाराणींच्या तोंडाकडे मी पाहात राहिलो. माझा त्यांच्या बोलण्यावर विश्वास बसेना. त्यांना आज इकडे का यायचे नव्हते ? महाराजांना का भेटायचे नव्हते ? माझ्या डोळ्यांसमोर अनेक प्रश्नचिन्हं होती. मी पुढे ऐकू लागलो.

''आम्ही इथे आल्यावर महाराजांना निरोप पाठवला. आपल्या धुंदीतच ते बाहेर आले.

बाबांना पाहाताच ते एकदम भानावर आले. बाबांचे संतापाने झालेले तांबडेलाल डोळे पाहून तर मलाही भीती वाटू लागली. महाराजांनी त्यांना नमस्कार केला. अपराध्यासारखे ते समोर उभे राहिले. त्यांची ती केविलवाणी अवस्था पाहून मला भडभडून आले. यदू, शेवटी मीही माणूसच आहे. त्यांची पत्नी आहे. बाबा एखादा भयंकर शाप देतील असं मला वाटलं मी पुढे गेले आणि बाबांना म्हणाले,

''बाबा....'' पण पुढचे शब्द त्यांनी पुरे करू दिले नाहीत. ते रागाने ओरडले-

''बस कर तुझी बडबड. मला काही ऐकायची इच्छा नाही. केवढ्यां अपेक्षेने तुझं संसारसुख बघण्याकरिता आलो होतो इथं पण इथं येऊन पाहातो, तो हे दृश्य !''

लगेच महाराजांचेकडे वळून ते म्हणाले,

''राजा ! आज तपस्वी शुक्राचार्य तुझ्यापुढे उभा आहे. पण तपस्वी म्हणून नव्हे तर तुझा सासरा म्हणून ! मी ऐकतो ते सगळं खरं आहे का ? देवयानीकडे तू दुर्लक्ष केलंस. काय.....?

''आचार्य ! शांत व्हावं आपण. माझं म्हणणं.....''

''गुन्हा करूनच्या करून, राजा मला शांत व्हायला सांगतोस ?''

''पण आचार्य......''

महाराजांची जवळजवळ बोबडीच वळली होती. काय बोलावे हे त्यांना सुचत नव्हते.

''मला काहीही ऐकायचं नाही. राजा तुला शर्मिष्ठेबद्दल जपून राहायला सांगितले होते ना ?''

''होय आचार्य.''

''ती राजकन्या असली तरी तिच्यावर प्रेम करू नकोस, हे मी बजावलं होतं तुला. होय ना ?''

''होय.''

शर्मिष्ठा ! माझी आई. तिच्यावर महाराजांचे प्रेम होतं. मग त्यात वाईट काय होतं ? मला तर लहान असताना आईने शिकवलं होतं -

प्रेम म्हणजे जीवनाची संजीवनी. प्रेम म्हणजे जीवनाचं तत्त्व. प्रेम म्हणजे जीवनाचं सत्त्व, एवढंच नव्हे तर प्रेम म्हणजे जीवनाचं सर्वस्व ! ते जीवनातून काढून टाकलं तर जीवन निर्माल्य बनेल. सुकलेले ! अचेतन ! माझ्या पुढची प्रश्नचिन्हं वाढतच होती.

महाराणींच्या बोलण्याकडे मी परत लक्ष दिले. त्या सांगत होत्या, 'यदू, बाबा त्यांना दरडावून विचारत होते, "राजा, तू माझ्या आज्ञेचा भंग केलास. यौवनानं बहरलेलं फूल तुझ्याहाती दिलं, त्याच्याकडे तू दुर्लक्ष केलंस आणि त्या शर्मिष्ठेकडे,- देवयानीच्या दासीकडे तू कामुकतेने...."

"पण आचार्य....माझं सांगणं आपण ऐकून घ्यावं. मी राजा आहे. आलेल्या अतिथीला रिक्तहस्ताने परत न पाठविणे हा माझा धर्म आहे. शर्मिष्ठा माझ्याकडे पुत्रफल मागू लागली. तिला रिक्त हस्ताने परत पाठविणे धर्मबाह्य होते. म्हणून मी ते तिला दिले. कामुकवृत्तीने नव्हे."

"राजा, मग त्याचवेळी मला का विचारले नाही? राजा, माझ्या स्वाधीन तू आहेस आणि होतास ना ? मग माझ्या परवानगीशिवाय ही गोष्ट का केलीस? हा चोरटेपणा का ? धर्मपालनाचे ढोंग करणारे लोक चोरटेपणानेच वागणार."

''पण मी चोरटेपणा केला नाही. हे कृत्य करताना कोणावरही अन्याय केला नाही. देवयानीवरही....''

''राजा, मला तुझ्या न्यायान्यायाचा निवाडा करायला वेळ नाही. तू माझी आज्ञा मोडलीस. देवयानीला दुःखी केलंस. राजा, तिचं जे दुःख तेच माझं दुःख. याचा परिणाम तुला भोगलाच पाहिजे.''

युवराज, या त्यांच्या बोलण्याने मीही घाबरले. एखादा भयंकर शाप मिळणार म्हणून मी बाबांच्या जवळ गेले. त्यांनी मला दूर लोटून दिले. महाराज तर अगदी घाबरून गेले होते. बोलण्याकरिता त्यांचे ओठ हलत होते पण मुखातून शब्द बाहेर पडत नव्हते. एवढ्यात बाबा कडाडले -

''राजा, कनक, कांता आणि यौवन या गोष्टी माणसाला अंध बनवितात. सांप्रतकाळी ज्या तारुण्याने तुला अंध केलं आणि माझी आज्ञा मोडायचं धाडस करायला सांगितलं, ते तुझं तारुण्य या क्षणी नष्ट होवो. तू जख्ख म्हातारा हो.''

''आचार्य.....''

महाराज पुढे बोलू शकले नाहीत. युवराज, ते ऐकताच मी एकदम ओरडले,

''बाबा हे काय केलंत ? त्यांच रूप पाहावत

नाही हो. त्यांचं रूप त्यांना परत द्या. बाबा, त्यांचं रूप त्यांना परत द्या.''

महाराजांना थोडा धीर आला. ते म्हणाले -

''आचार्य, माझ्या हातून चूक झाली. क्षमा असावी. मोठे लोक क्षमाशील असतात. अजून माझ्या इच्छा तृप्त झाल्या नाहीत. देवयानीबरोबर अजूनही मला संसार करायचा आहे. पण अशा म्हाताऱ्या पतीबरोबर तिला संसार कसा करावासा वाटेल ? कृपा करून मला उःशाप द्या.''

एवढ्या वेळात बाबा शांत झाले होते. विकारवशता नष्ट झाल्यावर माणूस विचारी बनतो आणि प्राप्त परिस्थितीचा समतोल बुद्धीने विचार करू लागतो. त्यांनाही आपण काहीतरी भयंकर शाप दिल्याची जाणीव झाली. थोडावेळ थांबून ते म्हणाले,

''राजा, तपस्व्याचा शाप कधी खोटा होणार नाही. तरीही तू माझा जावई आहेस. उशिरा का होईना तुला देवयानीबरोबर संसार करण्याची इच्छा झाली आहे. म्हणून मी उःशाप देतो. जर तुझ्या कुळातला, तुझ्या रक्ताचा कोणी तरुण तुझे वार्धक्य घ्यायला पुढे आला तर....तू आपले वार्धक्य त्याला देऊन त्याचं तारुण्य तुला मिळेल, पण हे तुझं तारुण्यं तुझ्या मृत्यूनेच त्या तरुणाला परत मिळेल.''

हे ऐकताच मी किंचाळले, "बाबा, हा काय उःशाप आहे? त्यापेक्षा उःशाप द्यायचा नव्हता. मघाच्या शापाहूनही हा भयंकर आहे."

ते ऐकून बाबा संतापले आणि रागारागाने म्हणाले,

"देवयानी, तुझा संसार बघायला मी येथे आलो तर इथे येताच तू आपल्या दुःखाचा पाढा वाचलास, त्यातून तुझं हित बघायला गेलो त्यातही मला अपयशच आलं. जन्मभर दुःखाशिवाय तू मला काय दिलं आहेस ? आता संसार करा नाही तर काय वाटेल तो गोंधळ घाला. मला नाही इथं थांबायला वेळ. मी आल्या पावलीच तपश्चर्येला परत जात आहे."

असं म्हणून ते निघून गेले.

"यदू, आता काय करायचं रे ?"

मी सारे ऐकून हतबुद्धच झालो. युवराजांना वाईट वाटले. ते हळूहळू महाराजांचेकडे गेले. ते ओळखून त्यांनी तोंड फिरवले. त्याच्याकडे वळून मोठ्या आशेने ते यदूला म्हणाले.

"यदू, तू माझा मुलगा आहेस ना ?"

"होय बाबा."

''तुझं माझ्यावर प्रेम आहे ना ?''

''निश्चितच आहे.''

''मग माझी एक आज्ञा आहे. ती पालन केलीस तर मी माझं राज्य तुला देईन. आत्ताच राजा म्हणून तुला अभिषेक होईल.''

''बाबा, पित्याची आज्ञा पालन करावी असं धर्मवचन आहे. मी ती अवश्य पालन करीन.''

''मग, यदू, तुझ्या आईच्या तोंडून आत्ता तू सारी हकीगत ऐकली आहेस. तू माझ्या कुळातला आहेस. माझ्या रक्ताचा आहेस. तेव्हा माझं वार्धक्य.....''

''बाबा......हे काय सांगता. ? ही काय आज्ञा आहे ? मला तुमचं राज्यही नको आणि वार्धक्यही नको. तुम्हीच बसा तुमचे पांढरे केस कुरवाळीत.''

''यदूऽऽ''

समोर चाललेले स्वप्न आहे की सत्य आहे हेच मला कळत नव्हते. संध्याकाळपासून सारं विचित्रच दिसत होते. महाराज यदूवर ओरडले पण पुन्हा लगेच आपल्या महालात गेले. महाराणींनी मात्र युवराजांना चांगलीच समज दिली.

मला मात्र हे पाहून स्वस्थ बसवले नाही. माझ्या आईच्या प्रेमाकरिता नियतीने महाराजांना दिलेली ही

कठोर शिक्षा होती. त्यांनी आईवर निःसीम प्रेम केलं होतं. मीही त्यांच्यावर तितकंच उत्कट प्रेम करणं आवश्यक होते. मीही त्यांचाच मुलगा होतो. त्यांच्याच कुळातला! त्यांच्याच रक्ताचा!

मी क्षणभरच विचार केला. माझ्या आज्ञापालनाच्या कर्तव्याची मला जाणीव झाली. काही वर्षे वार्धक्य घेतल्यानं माझं फारसं बिघडणार नव्हतं. माझं माझ्या वडिलांच्यावर नितांत प्रेम होतं. ज्याच्यावर आपलं नितांत प्रेम असतं, त्याच्याच करिता आपण त्याग करू शकतो. अगदी सर्वस्वाचा ! त्याग खऱ्या प्रेमाची कसोटी आहे. पण या गोष्टीत नुसता त्याग नव्हता तर आज्ञापालनाचं कर्तव्य होतं. मी उठलो. महाराजांच्या जवळ गेलो. युवराज आणि महाराणी आश्चर्याने पाहातच राहिले. मी हाक मारली.

''बाबा.....''

आश्चर्याने महाराजांनी माझ्याकडे पाहिले. त्या दृष्टीत उत्सुकता, भीती, आश्चर्य, कातरता यांचा संगम झालेला दिसला. मी पुढं म्हटलं,

''बाबा, मी आपली कहाणी ऐकली. मी आपलं वार्धक्य घ्यायला तयार आहे.''

त्यांचे डोळे आश्चर्य आणि आनंद यांनी विस्फरले गेले पण त्यांच्या लक्षात येताच ते म्हणाले.

‘‘बाळ, तुला ते घेता येणार नाही. माझ्या कुळातला...’’

‘‘मी आपल्याच कुळातला आहे. अगदी आपल्याच रक्ताचा !’’

‘‘म्हणजे... शर्मिष्ठेचा मुलगा तू? तू पुरू आहेस ?’’

‘‘होय, म्हणूनच म्हणतो • आपली आज्ञा पाळायला मी तयार आहे.’’

हे ऐकताच त्यांना आनंद झाला. त्यांचा चेहरा तशा स्थितीतही उजळून निघाला..... ‘‘शमा.....पुरू !’’ एवढेच अस्पष्टसे उद्‌गार त्यांच्या तोंडातून निघाले.

मी महाराणींच्याकडे बघितले. मला वाटलं होतं, त्या कृत्याने त्यांनाही आनंद होईल. पण तिथे दिसत होता संताप ! माझ्या मनात सहज येऊन गेलं, मनाची श्रीमंती ही संपत्ती आणि सत्ता यांवर अवलंबून असतेच असे नाही.

‘‘शर्मिष्ठा आली आहे.’’ कानावर आलेल्या या शब्दांनी मी भानावर आलो. पाठोपाठ माझी आई आत आली. महाराज पुन्हा सचिंत बनले. महाराणी अधिकच संतापल्या. अति क्रोधाने विवेक नष्ट होतो. त्यांचेही तसेच झाले. त्या कडाडल्या.

"शर्मिष्ठे ! आत्ता कशाला आलीस इथे ? कोणी आमंत्रण पाठविलं होतं ?

"क्षमा असावी महाराणी, आज युवराजांचा नगरप्रवेश होता. ते आनंदाचे दृश्य आपणही पाहावे. पुरू आणि यदू दोघंही माझेच. त्यांना नेत्रांच्या निरंजनाने ओवाळावं म्हणून नगरात आले. वाड्यांवर कळलं, सारे इकडे आले आहेत. त्याकरता इकडे आले."

"शर्मिष्ठे, तू माझी दासी आहेस, हे विसरलीस वाटतं. एवढं बोलताना जीभ कशी झडली नाही तुझी ?"

या शब्दांनी माझ्या हृदयावर एकदम वज्राघात झाला. महाराणींचं हृदय एवढं कठीण असेल याची कल्पनाही नव्हती. उलट आईने तर त्यांच्याबद्दल सगळ्याच चांगल्या गोष्टी सांगितल्या होत्या. मी फुलांची अपेक्षा केली होती, तेथून अग्नीच्या ज्वाळा निघत होत्या. हृदयाला आणि मनाला जाळणाऱ्या.!

महाराणींच्या शब्दाने आई गप्प उभी राहिली. तेवढ्यात दूर उभ्या असणाऱ्या महाराजांकडे तिचे लक्ष गेले. कारण आई येताच ते आतल्या महालात थोडे आडोशाला उभे राहिले होते. आपण कोठे आहोत, याचे तिला भान राहिले नाही. अकाली वार्धक्य

आलेल्या त्यांच्या चेहऱ्याकडे पाहात ती किंचाळली ''मऽहाऽराऽज !''

ती महाराजांच्या पायावर पडली. अश्रूंनी त्यांचे पाय भिजवू लागली. महाराजांनी तिला उठवलं. आवेग थोडा कमी झाल्यावर ती तशीच माझ्याजवळ आली आणि विचारलं,

''पुरू......! काय झालं रे यांना ? कुणी शाप तर दिला नाहीना ?''

आई दूर होताच बाबा आतल्या महालात गेले. कदाचित पुढे काय होणार याचा त्यांनी अंदाज बांधला असेल आणि लोकांच्या सहवासापेक्षा एकान्त परवडला, असे त्यांना वाटले असेल.

मी आईला सगळी हकीगत सांगितली आणि आईला म्हणालो,

''आई, बाबांचं वार्धक्य काही काळाकरिता मी घेणार आहे,''

''पुरू ! का माझा छळ मांडलाय तुम्ही सर्वांनी?''

महाराणी संतापाने आधीच जळत होत्या. हे ऐकताच त्या लगेच कडाडल्या,

''का ग ! आता का ? तुझं महाराजांच्यावर प्रेम

आहे ना ? मग सांग ना तुझ्या मुलाला, म्हणावं, त्यांचं वार्धक्य घे आणि बस पांढरे केस कुरवाळीत. त्याबदली राज्य मिळेल ना ! अगदी फुकट !''

महाराणींचा प्रत्येक शब्द मनाला जखम करीत होता. तरीही मी त्यांना म्हटलं,

''आई ! मला राज्य नको. त्यावर युवराजांचाच अधिकार असू दे. माझा वार्धक्य घेण्याचा अधिकार तर कोणी नाकारणार नाही ना ? त्या आज्ञेचे पालन करण्यात तर मला कोणी आडकाठी करणार नाही ना ?''

''छे, छे, अगदी खुशाल वार्धक्य घे. आम्हाला काय करायचे आहे ? आता त्यांची 'मायेची माणसं' आली आहेत. बसा खुशाल प्रेम करीत इथे. चल रे यदू! पुन्हा इकडे पाऊल टाकायला नको.''

महाराणींच्या मागोमाग यदू बाहेर पडला. ते पाहून आई म्हणाली -

''पुरू ! हे आणखी काय संकट ओढवून घेतो आहेस ? आज इतकी वर्षे मी तुझ्यासाठी जगत होते. एकच आशेचा किरण होता, तोही नष्ट करणार आहेस का ? का, तुम्ही सर्वांनी मला सुख न देण्याचं ठरवलं आहे ?''

''आई, तूच बोलत आहेस ना ? तुला दुःख

होईल असं मी कसं वागेन ?''

''मग तू भर तारुण्यात असताना एखाद्या शापाने माझ्या डोळ्यासमोर तुला जख्खड म्हातारा झालेला पाहिल्यावर मला काय सुख होईल ?''

''आई, पित्याची आज्ञा पालन करणं माझं कर्तव्य आहे.''

''पण पुरू ! अजून तू पुरतं जगही पाहिलं नाहीस. जीवनाचा उपभोग घेतला नाहीस तोच वार्धक्य......? मला कल्पनाही करता येत नाही रे ! जीवन समर्थपणे उपभोग घेण्याकरिता असते.''

''आई, तुला मी काय सांगणार ? लहान तोंडी मोठा घास घेतो आहे, क्षमा कर मला. पण आई, भौतिक सुखांचा कितीही उपभोग घेतला तरी मन शांत होत नाही. तूच मला शिकवलं आहेस की, उपभोगाने वासना कधीच शांत होत नसतात. उपभोगानं वासना शांत करणं हे तूप टाकून अग्नी विझवण्यासारखे असते. भोगापेक्षा त्यागातला आनंद श्रेष्ठ असतो.

आई, तू हे प्रत्यक्ष आचरलं आहेस. मी तर तुझाच मुलगा. मग मलाही तुझाच आदर्श ठेवायला नको का ?''

''पुरू, माझी गोष्ट वेगळी होती. हे सगळं मीच तुला शिकवलं असलं तरी पुरू, शर्मिष्ठेच्या मनातील

'गुरु शर्मिष्ठे' ने ते शिकविले आहे. पित्याची आज्ञा मोड असं 'गुरु शर्मिष्ठा' तुला कधीच सांगणार नाही. पण पुरू, शर्मिष्ठा ही आईही आहे रे ! त्या मातृहृदयाला तू आत्ताच जखखड म्हातारा व्हावास असं कधीच वाटणार नाही......कधीच वाटणार नाही.''

''आई, पारं समजतं मला. तरीही पित्याची आज्ञा पालन करणं हे धर्मशास्त्रात श्रेष्ठ मानलं आहे. आपलं आचरण धर्मशास्त्राप्रमाणेच असावे असं असताना मग मी जर काही वर्षे पिताज्ञेकरिता वार्धक्य घेतलं तर काय बिघडलं ? आई ! पिताज्ञेकरिता या तुझ्या लाडक्या मुलाला तोच महान आदर्श डोळ्यांपुढे ठेवून चालण्याचा आदेश दे.''

''नाही. पुरू, मला अडचणीत टाकू नको. न देता येण्यासारखं काही मागू नकोस. माझ्या मनाची ओढाताण तुला कधीच समजणार नाही. पुरू, मी महाराजांची पत्नी आहे. त्याचवेळी तुझी आई आहे. मी काय करू हेच मला कळेनास झालं आहे.''

''आई, महाराजांच्यावर तुझं निस्मीम आहे ना? आई, त्या प्रेमाची शपथ आहे तुला. जीवनातली महान लढाई जिंकायला तुझा मुलगा निघाला आहे. त्याला आशीर्वाद दे.''

''पुऽऽरू ! काय म्हणालास हे ? ही आई शर्मिष्ठा तुला कधीच वार्धक्य घे म्हणून सांगणार नाही. पण

पोरा, तिच्या हृदयाचा एक कोपरा केवळ कर्तव्याचा आहे, ती कर्तव्यदक्ष शर्मिष्ठा, जड अंतःकरणाने तुला सांगते आहे, 'यशस्वी हो पोरा, यशस्वी हो.....''

आईच्या अंगातली सारी शक्ती नष्ट झाल्यासारखे झाले. ती मटकन् खाली बसली. तिने डोळे घट्ट मिटले होते. त्या मिटलेल्या डोळ्यांतून देखील तिचं प्रवाही दुःख झरत होतं.

मला समाधान झालं. मी बाबांच्याकडे गेलो. त्यांना नमस्कार करून म्हटलं -

''बाबा, हा आपला मुलगा पुरू आपली आज्ञा आनंदाने पालन करायला तयार आहे.''

''पुरू, मी सारं ऐकलं. शर्मिष्ठा म्हणते ते खरं आहे. मला आता कसलीही इच्छा नाही. माझं वार्धक्य कुणाला द्यावं असंही वाटत नाही. मी सुखी आहे पोरा, जा तू, आईला सुखी कर.''

''बाबा, आपला मुलगा मी. आपल्याला काही सांगण्याचा अधिकार पोहोचतो असं नाही. पण थोर महात्मे असं म्हणतात, 'मनातल्या वासना तशाच ठेवून, आलेल्या तात्पुरत्या विरक्तीने कोणाचेही कधीच कल्याण होत नाही. ती विरक्ती संपताच वासना उफाळून वर येतात आणि त्यातून माणसाचा अधःपातच होतो.'

बाबा, काही वर्षे मी वार्धक्य घेतलं तरी चालेल. पुन्हा मला तारुण्य मिळणारच आहे. शिवाय आज्ञापालनाचे समाधान मिळेल.''

''पण आता.......''

''बाबा, मघाशी आपण आज्ञा केली होती. आता तिचे पालन करण्याचा हा तुमच्या मुलाचा हट्ट तुम्ही पुरविलाच पाहिजे.''

बऱ्याच समजुतीने नाईलाजाने बाबा तयार झाले.

आई अजूनही रडतच होती. बाबांनी मनातल्या मनात काहीतरी म्हटले. माझ्या डोक्यावर हात ठेवला. अंगावर वीज पडावी तसं काहीतरी झालं. गात्रं शिथिल झाली. मी आसनावर पटकन् बसलो. माझ्यासमोर आरसा होता. समोर बघितलं, मी जख्ख म्हातारा झालो होतो. माझं आयुष्य निर्माल्यवत झालं होतं तरी त्यातून पितृभक्तीचा आज्ञापालनाचा सुगंध दरवळत होता.

इतक्यात आईने डोळे उघडले. माझ्याकडे पाहाताच ती धावतच माझ्याकडे आली. माझ्या मांडीवर डोकं ठेवून ती मुसमुसून रडू लागली आणि रडतच आर्तस्वराने ती म्हणाली.

''पुरूऽऽहे काय केलंस रे ?''

※

# अमृत-सिंचन

राणी लुमावती बरेच दिवस एका प्रश्नावर विचार करीत होती, पण मनाचा निश्चय होत नव्हता. आजही रात्री महालात ती एकटीच विचार करीत बसली होती. रात्र बरीच वाढली होती तरी राजा गोपीचंद अजून आला नव्हता. मंचकावर बसून ती त्याचीच वाट पाहात होती.

"या घटना त्यांच्या कानावर घालाव्या की घालू नयेत ? हा विचार तिला त्रस्त करीत होता. बऱ्याच विचारांती तिने ठरविले की, या साऱ्या घटना त्यांना सांगाव्यातच. नाहीतर एक दिवस आपल्यालाही भणंग भिकाऱ्याचे आयुष्य कंठावे लागेल. संसाराची राखरांगोळी होईल. सुख जाईल आणि संन्यास घ्यावा लागेल.

आपण सांगितल्यावर राजा निश्चित ऐकेल याची तिला खात्री होती. आपल्या सौंदर्याने तिने

राजाला अंकित करून ठेवले होते. त्याच जोरावर ती पट्टराणी झाली होती. कोणतेही काम करवून घ्यायला हे सौंदर्य तिला उपयोगी पडत असे. ती रूप-गर्विता होती.

तारुण्य, सत्ता, संपत्ती यांचाच मद असतो असे नाही तर सौंदर्याचाही मद असू शकतो. यामुळेच राजाला सर्व घटना सांगण्याचा तिने निश्चय केला. थोड्याच वेळात राजाची पावले वाजली. प्रत्येक पाऊल भारदस्तपणे टाकले जात होते. त्या प्रत्येक पावलात सत्ता, अधिकार, अहंकार यांचा प्रत्यय येत होता.

राजा मंदिरात आला. लुमावती तशीच तोंड फिरवून बसली होती. राजा तिच्याजवळ जाऊन उभा राहिला. तरीही ती शांतच होती. शेवटी त्यानेच बोलायला सुरुवात केली.

''आज राणीसरकार रागावलेल्या दिसतात आमच्यावर !'' तरीही शांतता.

''बोलायचं नाही असं ठरवलंय वाटतं ?''

''आमच्यावर प्रेम नसलेल्या माणसाशी कशाला बोलायचं ?''

''छान, हे कशावरून ठरवलंत ?''

''म्हणून इतक्या लवकर आलात वाटतं ? किती रात्र झाली ?''

''उशीर झाला म्हणून राग आलाय होय पण सरकार, राजदरबारची कामं असतात. ती आटोपल्याशिवाय...''

''आमचीही काही कामं असतातच की !''

''तुमची कामं....सांगा. आधी आम्ही त्यांच्याकडे लक्ष देऊ. सांगा. आज काय काम आहे राणीसरकारांचं ?''

''सांगावं की सांगू नये, असा विचार करते आहे.''

''का.....? आपण सांगितलेलं काम आजपर्यंत कधी झालं नाही का ? मग .....आजच शंका ?''

''शंका नाही पण प्रश्न नाजूक, तुम्हांला पटतो की नाही ?''

''एवढं महत्त्वाचं सांगणं असेल तर ऐकलंच पाहिजे.''

लुमावती राजाच्या जवळ जाऊन बसली आणि लडिवाळ भाषेत सांगू लागली.

''नाथ, गावात कोणी योगी आलाय म्हणे !''

''आला असेल. त्याचं काय....?''

''खूप सामर्थ्यवान आहे तो.....सारे म्हणतात.''

"हं. माझ्या सामर्थ्यापुढे त्याचं सामर्थ्य काय असणार? अगं, काजव्याचं सामर्थ्य तू या प्रतापी सूर्याला सांगतेस ?"

"तसं नाही. तरीपण आजकाल गावात त्याचीच चर्चा चालते म्हणून...."

"पण, आम्हांला त्याच्याशी काय करायचं आहे? नगरात असे अनेक योगी येतात आणि जातात. तिकडे पाहण्याची आम्हांला काय जरूर ?"

"आमच्या राजवाड्याशी बेतलं म्हणून."

"म्हणजे.....?"

"विश्वास बसेल माझ्यावर ?"

"लुमावती, शंका घेऊ नकोस. काय असेल ते सरळ सांगून टाक. त्या जोगड्याचा आमच्या घराशी काय संबंध ?"

"सासूबाई त्यांच्या भजनी लागल्यात. त्या साधूकडे जातात."

"काय....अन्. तू तिला काही सांगितलं नाहीस?"

मी त्यांना सांगितलं पण त्याच उलट म्हणाल्या, "सूनबाई, अगं राजविलासात आता मन रमत नाही, परमार्थ साधावा असं वाटतं. स्वतःच्या सुखाचा शोध

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग.
क्र. 3002 दिनांक 90.8.78
विषय का-का क्र. ......

सोडून दिल्याशिवाय जीवनातील अंतिम सुखाचा बोध होत नसतो.''

''परमार्थ साधायला नको कोण म्हणतो ? त्यासाठी इथं काही कमी आहे का ? विपुल संपत्ती पडली आहे. दानधर्म करावा आणि सुखात रहावं. त्यासाठी त्या जोगड्याकडे जाण्याची काय गरज ? हा राजप्रतिष्ठेचा प्रश्न आहे.'' प्रतिष्ठा, मोठेपणा यांच्या काही विशिष्ट कल्पना आपण ठरवितो आणि सत्ता व संपत्ती यांचा मद त्यांना खतपाणी घालीत असतो. हे राजाच्या लक्षातच आले नव्हते. येत नव्हते. त्यामुळे प्रतिष्ठेच्या आपल्या कल्पनांच्या दृष्टिकोणातून तो या घटनांच्याकडे पहात होता. 'आपल्या सामर्थ्यापुढे इतरांचे सामर्थ्य असणार ते किती ?' या विचाराने, अन्य काही बाबतींत इतर लोक श्रेष्ठ असू शकतील याची त्याला कल्पनाही करवत नव्हती. मद म्हणजे अविवेकी, आंधळी, दिशाहीन शक्ती ! मदाचे लक्ष स्वतःकडे असते. इतरांचे श्रेष्ठत्व त्याला मान्य होत नाही. गोपीचंदाचे विचार आपल्याला अनुकूल आहेत, हे पाहताच लुमावतीने आणखी खुबीने बोलायला सुरुवात केली.

''राजप्रतिष्ठेचा प्रश्न असला तरी तो योगी असामान्य आहे असं सासूबाई म्हणत होत्या.''

''हं....पण त्याचं नाव तरी काय ?''

''जालंदरनाथ.''

''तो..हातात चिमटा. सर्वांगाला राख फासणारा. हाताला काळे दोरे गुंडाळणारा, तो अन् असामान्य ?''

''तो रस्त्यानं, डोक्यावरून गवताचा भारा घेऊन चालला तर तो भारा अधांतरी रहातो.''

''असल्या थापा आम्हांला नका ऐकवू. हेच ना त्याचं सामर्थ्य !''

''अहो, मी नाही विश्वास ठेवत पण सासूबाई विश्वास ठेवतात. त्याच्याकडून त्या गुरूपदेशसुद्धा घेणार आहेत म्हणे !''

''एवढं महत्त्व वाढलंय त्याचं ?''

''आणखी ऐकलं तर विश्वास ठेवाल...?''

''हं...''

''फक्त सासूबाईच उपदेश घेणार आहेत असं नाही, तर आपल्यालाही उपदेश घ्यायला त्या लावणार आहेत ... जोगी बनवणार आहेत ... जोगी ... तुम्ही जोगी व्हा अन् आम्हांलाही तुमच्या मागून हिंडायला लावा कटोरं घेऊन.''

राजा एकदम ओरडला,

''अशक्य...असं होणार नाही ... असं होणार नाही.''

''आणि झालं तर तुम्ही काय करणार ?'' राणी शांतपणे म्हणाली.

''काय करणार.....? मला अशक्य असं काय आहे? वाटेल ते मी करू शकेन.''

गोपीचंदाने आपल्या हाताची मूठ आवळली आणि रागाने दुसऱ्या हातावर आपटली. तो स्वतःशीच म्हणाला, ''काय करणार ....?'' राजा रात्रभर तळमळत राहिला.

सकाळी तोच प्रश्न मनात घेऊन गोपीचंद आपल्या महालात गेला. थोड्या वेळातच सेवकाने सांगितले,

''महाराज, बाहेर हेर आले आहेत. आपलं दर्शन मागताहेत.''

थोड्या वेळातच एक हेर आत आला. राजाने विचारल्यावरून त्याने नगराची वार्ता सांगायला सुरुवात केली.

''महाराज, गावात कोणी एक योगी आला आहे. जालंदर त्याचं नाव. सगळेचपण त्याची स्तुती करीत असतात.''

''काय......?'' राजा रागाने म्हणाला.

क्षमा असावी महाराज पण हे सत्य आहे. त्याच्या अनेक वार्ता लोकांत पसरल्या आहेत. त्यांनी लोक दिपून गेले आहेत. त्यांचा प्रभाव येथपर्यंत पडला आहे.''

''म्हणजे....आम्ही नाही समजलो.

क्षमा असावी महाराज...पण राजमाता मैनावतीदेवी सुद्धा उद्या त्यांचा उपदेश घेऊन त्यांना गुरू करणार..''

''बस्स् झालं. आम्हाला पुढे काही ऐकायचं नाही. जा तू.''

आपली काय चूक झाली हे हेराला कळलं नाही. राजाला मुजरा करून तो निघून गेला. राजा अस्वस्थ झाला. त्याने प्रधानाला बोलावून घेतले. थोड्या वेळातच प्रधान आले. मुजरा करून उभे राहिले. राजाने विचारले,

''प्रधानजी, हे होता कामा नये. आमची आज्ञा आहे.''

''पण...महाराज जालंदर एक महान योगी...''

''बस्स्. तुम्हीही हेच म्हणता....कोणासमोर बोलता आहात ? आता जास्त बोलाल तर परिणाम

वाईट होईल.''

राजाचा तोल सुटला होता. सगळ्यांच्या तोंडून हेच ऐकायला मिळत होते. त्यात आपली आई. त्यांचा उपदेश घेणार आणि आपल्यालाही उपदेश देणार ! मग सत्तेचा, संपत्तीचा काय उपयोग ? या विचाराने तो वेडापिसा झाला.

पुढचा अनर्थ घडायच्या आत या योग्याची व्यवस्था लावलीच पाहिजे. त्याच्या डोक्यात वादळ घोंगावू लागले. ''मी राजा, काय वाटेल ते मी करीन. मला कोण विचारणार ?'' राजा मदाच्या पूर्ण आहारी गेला. विकाराधीन झाला. त्याला कळलं नाही, तारुण्य, सत्ता, संपत्ती यात माणसाच्या अंगात मद उत्पन्न करण्याची प्रचंड ताकद आहे. 'मद' निर्मिती हा नैसर्गिक परिणाम असला तरी मदाची ही ऊर्मी जितकी उत्साही तितकीच आंधळी असते. त्याच रात्री......

रात्रीनं आपला अंमल पूर्ण बसवला. निवडक लोकांनी जालंदराला शोधून अज्ञात ठिकाणी आणला. राजा उन्मत्त झाला होता. आपण काय आज्ञा देत आहोत हे त्याला समजतही नव्हते. राजाने शब्द उच्चारले, ''जोगड्याला खड्ड्यात गाडून टाका. आणि कोणाला कळू नये म्हणून वरती घोड्याची लीद टाका.'' राजाज्ञा झाली. त्याची कार्यवाही झाली. मदोन्मत्त उद्‌गार अमलात आले. पण, कोणत्याही

प्रकारचा उन्माद म्हणजे मृत्यू ! हा मृत्यू नेहमीच्या मृत्यूहूनही भयंकर असतो. कारण त्यात माणसाचा आत्माच मृत होतो. जालंदरनाथांना गाडण्यात आले.

"ही वार्ता बाहेर पडली तर डोकी उडविली जातील." राजाने ताकीद दिली.

दुसऱ्या दिवशी नगरात वार्ता पसरली. "योगी जालंदरनाथ गावाला निघून गेले."

काही काळ गेला. लोक जालंदरनाथांना विसरून गेले. मैनावती मात्र फार कष्टी झाली. तिने त्यांना शोधायचा खूप प्रयत्न केला पण व्यर्थ ! राजा वरकरणी शांत होता पण कधीतरी तो अस्वस्थ होत असे. दचकत असे. हातून घडलेली वाईट कृत्ये मन:शांती हिरावून घेतात. मनाच्या संथ पाण्यात अचानक प्रचंड वादळ निर्माण करतात. असं झालं तरी अहंकार, मद त्याच्या मदतीला धावत असे. आणि त्या गुर्मीत तो पुन्हा शांत होत असे. असे बरेच दिवस उलटले. राजाचा मद कमी झाला नाही आणि मैनावतीची जालंदरनाथांची भक्तीही !

एके दिवशी राजा आपल्या महालात बसला होता. घाबऱ्याघाबऱ्या एक दूत आला. त्यानं सांगितलं,

"महाराज... महाराज..."

भीतीनं त्याच्या तोंडून एकही शब्द फुटत नव्हता.

राजाने विचारले.

"काय रे, काय झालं....? एवढा घाबरलास का?"

"महाराज जालंदरनाथांचा शिष्य कानिफ..."

"काय.......?" राजा दचकला. भांबावला.

"महाराज कानिफ़नाथ रागावून आले आहेत. एवढ्यात इथं पोहोचतील...."

तोच राजाच्या कानावर शब्द आले.

"कुठे आहे तो मदोन्मत्त राजा गोपीचंद ? माझ्या गुरूची विटंबना करणारा ! कुठे आहे?"

राजा महालाबाहेर आला. कानिफनाथाचे डोळे खदिरांगारासारखे लाल झाले होते. ओठ थरथरत होते. हातातला चिमटा उंचावला होता. जटा अस्ताव्यस्त झाल्या होत्या. हिसक्याबरोबर त्या वेड्यावाकड्या होऊन मानेवर पडत होत्या.

त्याचे ते भयंकर स्वरूप पाहून राजा घाबरला. पाप भित्रं असतं. केलेले पाप झटकन त्याच्या डोळ्यासमोर उभे राहिले. मदाची गुर्मी एका क्षणात उतरली. तो दीनवाणा झाला. हात पटकन जोडले गेले. कसे तरी शब्द बाहेर पडले.

"क्षमा स्वामी ... क्षमा ....."

''मदांधा ! आता क्षमा मागतोस ? एका महान योग्याचा छळ करताना तुला काही वाटलं नाही. सत्तेनं तू मदांध झाला होतास नाही का ? आता भोग त्याची फळं.''

कानिफनाथाने झोळीतून राखेची चिमूट काढली राजा त्यांच्या पायावर पडला. कानिफनाथाचा क्रोध कमी होत नव्हता.. त्या अवस्थेत त्याने मंत्र म्हणण्यास सुरुवात केली. एवढ्यात, धावत- धावत मैनावती तेथे आली आणि म्हणाली,

''महाराज, थांबा ... थांबा ... जालंदरनाथांची शिष्या आपली क्षमा मागते आहे.''

कानिफनाथाने डोळे उघडले. हात खाली गेला. राग थोडा कमी झाला.

''कोण, जालंदरनाथांची शिष्या ?''

''होय मैनावती .... गोपीचंदाची आई ... महाराज, क्षमा करा. मी आपली क्षमा मागते. माझ्या मुलाकडून अपराध घडला त्याची शिक्षा मला करा.''

हे ऐकून राजाला गहिवरून आलं होतं. कानिफनाथही थोडे शांत झाले होते. मैनावती पुढे म्हणाली,

''महाराज, विकाराधीन झाल्याने त्याने गुन्हा

केला पण माणसांचा उद्धार करणं हे मोठ्यांचं काम. त्याला सन्मार्गाला लावण्यातच आपला मोठेपणा आहे. महाराज, मी आपली गुरुभगिनी ! याला सन्मार्गाला लावा. आपल्या आणि जालंदरांच्या क्रोधाग्नीतून आपल्या भाच्याला अभय द्या.''

मैनावतीचे कळकळीचे शब्द ऐकून कानिफनाथ द्रवले. त्यांनी मैनावतीला वचन दिले.

''मैनावती, राजाचा अपराध भयंकर पण केवळ तुझ्या शब्दासाठी मी त्याला अभय देतो.''

''राजा, बघ. तुझ्यासाठी या माऊलीनं अभय मागितलं म्हणूनच मी शांत झालो. अन्यथा तुझ्या राजवैभवासकट तुझी, आणि सत्ता, संपत्ती, तारुण्यासह, तुझ्या मदाची राखरांगोळी झाली असती.''

''महाराज, आपली कृपा थोर आहे.''

''राजा, मला माझ्या गुरूचा शोध लावणं अशक्य नाही, पण तू मला ती जागा दाखव.'

सगळे त्या जागेवर आल्यावर कानिफनाथाने विचारले, ''राजा, आता माझ्या गुरूंना वर काढ. त्यांचे चरण पाहिल्याशिवाय मी आता राहू शकत नाही.''

''महाराज, आपणच काही उपाय सुचवा. हा राजा गोपीचंद आहे असं कळलं तर जालंदरनाथ त्याला

जाळून भस्म करतील.'' मैनावती पुन्हा काकुळतीनं म्हणाली,

''महाराज, मी अज्ञानी आहे. आपणच उपाय सुचवावा. मी आपली आज्ञा पाळीन.''

कानिफनाथांच्या सांगण्याप्रमाणे राजाने सोने, तांबे, रूपे, पितळ आणि लोखंड यांचे स्वतःसारखेच पुतळे केले. कानिफनाथाने योग्य त्या सूचना दिल्या.

जालंदरनाथांना जेथं गाडलं होतं, तिथं सोन्याचा पुतळा ठेवला. राजा कुदळीने खणू लागला. आतून आवाज आला.

''कोण खणतो आहे ?''

''मी राजा गोपीचंद आहे.''

गोपीचंदाचे नाव ऐकताच जालंदरनाथांचा क्रोध उफाळून आला. ते म्हणाले,

''कोण राजा गोपीचंद ? ज़ळून भस्म हो .''

सोन्याचा पुतळा जळून गेला. असे एका मागोमाग राहिलेले पुतळे जळून गेले. राजा पुन्हा खणू लागताच कानिफाने सांगितले,

''गुरुदेव, मी आपला शिष्य कानिफ ! आपल्या चरणांच्या दर्शनाची इच्छा असल्याने राजा गोपीचंदाकडून आपल्याला बाहेर काढतो आहे.

माझ्यासाठी तो हे करतो आहे.''

हे ऐकताच जालंदरनाथ म्हणाले,

''राजा, अद्याप तू माझ्या क्रोधाग्नीत जळून गेला नाहीस. माझ्या शिष्याने तुला अभय दिले आहे. ठीक आहे. शतायुषी हो.''

असं म्हणून ते मंत्र सामर्थ्याने बाहेर आले. कानिफनाथांनी त्यांच्या पायावर लोटांगण घातले. मैनावतीच्या डोळ्यांतून आनंदाश्रू झरू लागले. तिनेही गुरुचरणांना मिठी मारली. ती म्हणाली,

''गुरुमाऊली, या अज्ञानी बालकाकडून अपराध



घडला. त्याला क्षमा करून योग्य मार्ग दाखवा.''

गोपीचंदानेही साष्टांग नमस्कार घातला. त्याला उठवीत आशीर्वाद देत जालंदरनाथ म्हणाले,

''राजा, तुझ्या आईची पुण्याई आणि माझ्या शिष्याचा वरदहस्त यामुळेच तू आज जिवंत राहिलास पण एक लक्षात ठेव, सत्ता, संपत्ती, सौंदर्य आणि तारुण्य यांपैकी कोणतीही एक बाब माणसाला मदोन्मत्त करते. त्यांनी उन्मत्त होऊन अविचाराने कोणतीही कृती कधीही करू नकोस.''

''गुरुदेव, आपल्या उपदेशाच्या अमृतसिंचनाने मला नवा जन्म लाभला आहे. आपला उपदेश मी निरंतर लक्षात ठेवीन.'' असे म्हणून त्याने पुन्हा नमस्कार केला. मैनावती व कानिफनाथ यांचेही हात जोडले गेले. सारे भारावलेल्या अंतःकरणाने हा मधुर प्रसंग पहात होते.

# प्रायश्चित

"ज्या पुण्यावर आमचा एवढा जीव, त्या पुण्यावर निजामानं हल्ला करायचं धाडस करावं ? त्याची होळी करावी ? त्याला विद्रूप करावं ? स्वारीवर आम्ही गुंतणार असल्याने मुद्दाम रास्तेमामांच्यावर पुण्याच्या रक्षणाची जबाबदारी सोपविली होती. आपलं माणूस म्हणून ! राज्याचे प्रतिष्ठित, कर्तबगार सरदार म्हणून ! त्यांच्याकडून कसूर...? ते असं करतील...? कसं शक्य आहे ते...? पण पुणं जळालं ही तर वस्तुस्थिती आहे. ती कशी नाकारणारऽ ?"

राक्षसभुवनाच्या लढाईत विजय मिळवून, निजामाचा पुरा बीमोड करून माधवराव पेशवे पुण्यास यायला निघाले होते. या अभूतपूर्व यशाने त्यांच्या मनात आनंदोर्मी निर्माण व्हायला हव्या होत्या. या सोन्याच्या दिवसाचे स्वागत थाटात व्हायला पाहिजे होते. पण तसे होत नव्हते. आनंदी मनाचा एक कोपरा

सोन्याच्या दागिन्यांनी सुशोभित केला होता. कपाळावरच्या मखमलीच्या सौंदर्यात सोन्याचा अर्धचंद्र भर घालीत होता. सुळ्यांवर लावलेल्या सोन्याच्या बिडावरील पाणीदार मोत्यांचे घोस त्याच्या प्रत्येक पावलागणिक हिंदकळत होते. पुढे भगव्या झेंड्याचे हत्ती थाटाने चालले होते. त्यांच्यापुढे वाजंत्र्या वाजत होत्या. नौबती झडत होत्या. सनईच्या मंजुळ आवाज ऐकू येत होता.

लोक आतुरतेने श्रीमंतांची वाट पाहात होते. 'विजयी' माधवराव पुण्यात प्रवेश करणार ! त्यांना पुण्याचं झालेलं - नुकसान कोठेच दिसू नये, याची साऱ्यांनी खबरदारी घेतली होती. पुणं शृंगारलं होतं. घरोघरी गुढ्या उभारल्या होत्या. लोकांचा उत्साह, आनंद प्रत्येकाच्या मुखावरून ओसंडत होता. दुतर्फा उभे राहिलेले लोक श्रीमंतांचा जयजयकार करीत होते. त्यांच्यावर फुलं उधळीत होते.

श्रीमंतांची मिरवणूक शनिवारवाड्यांपुढे आली. हत्तीवरून ते खाली उतरले. वरच्या गच्चीवरून त्यांच्यावर सोन्यारूप्याची फुले उधळण्यात आली. दाराशीच त्यांच्यावरून दहीभात उतरविला गेला. दिल्लीदरवाज्यातच बापू, नाना, शास्त्रीबुवा सामोरे आले. श्रीमंत त्यांच्यासह चालू लागले. श्रीमंतांनी येतायेता पुण्याचे अवलोकन केले होते. आपले थाटाने

केलेले स्वागतही अनुभविले होते. त्यांना मात्र इतकी अपेक्षा नव्हती. ते म्हणाले,

''नाना ! आम्ही ऐकत होतो की, निजामाने पुण्याची पार होळी केली !''

''होय, श्रीमंत ! खरं आहे ते.''

''आणि तरीही आमचं एवढं भव्य स्वागत ?''

''श्रीमंत ! आपलं नाही तर मग स्वागत तरी कुणाचं करायचं ? आपण राक्षसभुवनला विजय संपादन केला. त्यामुळे साऱ्यांनाच समाधान वाटतं आहे. आपल्याला कर्तबगार राजा मिळाला असं सारी प्रजा समजते आहे. त्याच आनंदाच्या प्रीत्यर्थ प्रजेने हे सारे स्वयंस्फूर्तीने केले आहे.''

''नाना ! प्रजेच्या आमच्यावर असलेल्या नितांत प्रेमाने आम्ही भारावून गेलो आहोत. आम्ही त्यांचे खरोखर फार मोठे ऋणी आहोत. पण नाना ! आजच्या स्वागतात, आजच्या आनंदाच्या क्षणी सुद्धा आमच्या प्रजेच्या मनाच्या एका कोपऱ्यात दुःखाची वेदना असावी. असं आम्हांला वाटतं ! प्रजा दुःखी असताना आमचे होणारे हे स्वागत आम्हांस मान्य नाही.''

''श्रीमंत ! आपल्या बोलण्याचा मतलब ध्यानी नाही आला.''

उत्तर ऐकून लोक निराश झाले. पेशव्यांबद्दल त्यांच्या काही अपेक्षा होत्या, पण त्यांच्या कारभाऱ्याने केलेली बोळवण त्यांच्या मनाला लागली. ते नाईलाजाने नि निराश मनाने घरी परतले. मनातून मात्र वाटत होते, आज ना उद्या पेशवे भेटतील. तक्रार ऐकतील. आपली दुःखं दूर करतील. दोन तीन दिवस हा प्रकार चालला होता. माधवरावांना मात्र याची अजिबात कल्पना नव्हती. त्यांची प्रकृती हळूहळू सुधारत होती.

आज सकाळपासून त्यांना जास्त हुषारी वाटत होती. सकाळीच मुखमार्जन आटोपले होते. इतक्यात रमाबाई दूध घेऊन आल्या. माधवरावांची दृष्टी त्यांच्याकडे जाताच ते म्हणाले -

''या ना! आणि आज जातीनिशी आपण आलात?''

रमाबाई काही न बोलताच त्यांच्याकडे पाहून हसल्या. त्यांनी दिलेले दूध माधवरावांनी घेतले आणि ते महालातल्या खिडकीपाशी जाऊन काही तरी निरखून पाहू लागले.

''काय पहाता निरखून?'' रमाबाईंनी विचारले.

''रमा! आज सकाळीच बापू एवढ्या लगबगीने कुठे चालले आहेत ते पहातो आहे.''

बापू आपली पावले जोरजोरात उचलीत

दिल्लीदरवाज्याच्या रोखाने जात होते. त्यांच्या आविर्भावावरून थोडीशी रागाची छटाही दिसत होती.

''कोण आहे रे तिकडे?'' माधवरावांनी विचारले.

एक सेवक आत आला आणि मुजरा करून उभा राहिला.

''बापूंना आम्ही बोलावले आहे म्हणून सांग.''

''जी.''

सेवक निघून गेला. रमाबाई बाजूला गेल्या आणि थोड्याच वेळात बापूंची पावले जिन्यावर वाजली.

''या बापू ! आम्ही आपलीच वाट पहात होतो.''

''काही विशेष काम....''

''नाही, आपल्याला एवढ्या लगबगीनं जाताना पाहिलं, वाटलं की, एवढ्या लगबगीनं आपण कोणत्या महत्त्वाच्या कामाला जात आहात ते तरी बघावं!''

''काही विशेष नाही श्रीमंत ! हल्ली दोन-चार दिवस रोज शनिवारवाड्यावर लोक गर्दी करतात...''

''असं ! त्यांचं काही महत्त्वाचं काम ?''

''श्रीमंतांची भेट हवी म्हणतात.''

''कशाला, काही विशेष घडलं नाहीना या

‘‘रमा ! आम्ही काळजी घेऊ.’’

‘‘पण, आत्ता गेलं नाही तर ...’’

‘‘तुम्ही अजून लहान आहात ! प्रजेचं काही तरी महत्त्वाचं काम असेल. त्याशिवाय ते येथे आले नसतील. त्यांच्या तक्रारी, त्यांची दुःखं आपण समजावून न घेता इथं आपण सुखोपभोग घेणं आम्हाला योग्य वाटत नाही. प्रजेचं हित पहाणं हेच आमचं कर्तव्य आहे. प्रजेच्या आनंदातच आमचा आनंद आहे. तुम्ही जसं आमच्यावर प्रेम करता तसंच आम्हालाही प्रजेवर प्रेम करायला नको का ? रमा, तुझ्या प्रेमाच्या या वस्त्राला कर्तव्याची झालर असेल तरच ते अधिक उठून दिसेल नाही का ? तुम्ही निश्चिंत रहा. आम्ही योग्य ती काळजी घेऊ.’’

रमाबाई निघून गेल्या. माधवरावांनी घाईघाईने आपला फेटा बांधला आणि ते दिल्ली दरवाज्याच्या रोखाने चालू लागले. माधवराव दिल्ली दरवाज्यापाशी येताच नाना, बापू सामोरे आले. नानांनी श्रीमंतांना विचारले.

‘‘श्रीमंत ! आपली तब्येत बरी नाही. बाहेर ऊनही बरेच आहे. लोकांना आतच बोलावलं तर...?’’

‘‘किती लोक आहेत बाहेर ?’’

‘‘दीड-एकशे तरी असतील.’’ नानांनी उत्तर

दिले.

माधवरावांनी बापूंच्या कडे एक जळजळीत कटाक्ष टाकला. बापूंना मात्र त्यांच्या नजरेकडे पहाण्याचे धाडस होत नव्हते. पाप भित्रं असतं. त्यांनी तत्काळ मान खाली घातली. माधवराव नानांना म्हणाले,

''नाही, नाना ! आम्हीच त्यांना भेटायला बाहेर जाणार आहेत.''

एवढं बोलून माधवराव चालू लागले. नानांची मात्र त्या वाक्याने तारांबळ उडाली. त्यांनी भराभर दोन-चार सेवकांना आज्ञा केली आणि समोरच्या पटांगणात श्रीमंतांची बसण्याची व्यवस्था केली. एकाने मंचक टाकला. दुसऱ्याने गादी अंथरली. तिसऱ्याने लोड ठेवला आणि एकजण हातात छत्र घेऊन उभा राहिला.

माधवरावांनी क्षणभरच संपूर्ण उघडलेल्या दरवाज्यातून समोरच्या पटांगणात दृष्टी टाकली. शे-दीडशे लोक विस्कळितपणे उभे होते. काही आपापसांत कुँजबुजत होते. त्यांच्या पेहरावावरून, त्यांच्या हालचालीवरून त्यांचे दैन्य प्रकट होत होते. माधवरावांना पाहताच क्षणात संपूर्ण शांतता पसरली. लोक आश्चर्याने, भारावलेल्या नजरेने पहात होते. पेशवे आपल्या भेटीला येतील याची त्यांना खात्रीच वाटत नव्हती म्हणूनच त्यांचा त्यांच्याच डोळ्यावर विश्वास बसत नव्हता. माधवराव मात्र एव्हाना

करायचं तेबी समजत नाय !''

बापू सगळं ऐकत होते. पण यांना गप्प कसे बसवायचे हे त्यांना समजत नव्हते. ते माधवरावांच्या पाठीमागे उभे असल्याने लोकांना दापीत होते पण धन्याच्या स्निग्ध, प्रेमळ डोळ्यांपुढे त्यांच्या डोळ्यांची कोणालाच भीती वाटत नव्हती. तरी बापू म्हणालेच...

''पुरे, पुरे ! किती साध्या साध्या गोष्टी आपण श्रीमंताना सांगणार आहात ?''

माधवरावांनी ताडक्न मागे वळून पाहिलं आणि एक भेदक कटाक्ष बापूंच्याकडे टाकीत ते म्हणाले,

''बापू ! या साध्या गोष्टी ! लोकांना घरं नाहीत, खायला अन्न नाही, कपडे पण नाहीत आणि या साध्या गोष्टी ?''

माधवरावांचा आवाज चढला होता तरी देखील बापू म्हणाले,

''श्रीमंत ! साऱ्यांच्या अशा तक्रारी ऐकून ..''

''बापू ! लोक आम्हाला सांगत आहेत. आम्ही त्याचा विचार करू. आपण स्वस्थ रहा.''

बापू गप्प बसले. लोकांनाही धीर आला. लोक आपापली गाऱ्हाणी सांगत होते. माधवराव मात्र ही गाऱ्हाणी ऐकून सुन्न झाले होते. त्यांच्या चेहऱ्यावर

दुःख, क्रोध, अनुकंपा, दया यांच्या विविध छटा चमकून जात होत्या.


इतक्यात, गर्दीतून वाट काढीत एक म्हातारी तेथे आली. माधवराव तर आश्चर्याने थक्क झाले. ‘‘आमच्या राज्यात म्हाताऱ्या स्त्रियांनाही आपली गाऱ्हाणी सांगायला पेशव्यांच्याकडे यावे लागावे न !’’ याचं त्यांना वाईट वाटलं. म्हातारी पुढे आली. ऐंशीच्या घरात तिचं वय होतं. हातापायांवर सुरकुत्या पडल्या होत्या. ती थरथरत होती. ती समोर येताच माधवरावांनी तिला विचारले.

‘‘आई ! आपलीही काही तक्रार आहे का ?’’ माधवरावांच्या प्रेमळ शब्दांत प्रेमाची स्निग्धता होती-चांदण्याची शीतलता होती. बापूंच्या मात्र कपाळाला आठी पडली होती.

‘‘काम हाये म्हनून तर हतं आलेय बाबा ! आपलं कर्म कोपलं, तुला तरी काय सांगू ?’’

‘‘म्हणजे, काय झालं आई ! आपण शांत मनानं सांगा. आम्ही त्याची दखल घेऊ.’’

‘‘तुझ्या आज्याच्या वेळी मालक सरकारात नौकरीला व्हतं. माझी दोन मुलंबी ततंच व्हती. कर्मानं तीन्हीबी नेली. आता म्हातारपनी वाड्याच्या आधारानं दिस मोजीत व्हते, तर त्योबी समदा लुटून नेला. कायबी



रायलं नाय. अरे ! कधी बाहेर पडायची सवय नाही, आन् पडायची बारी आली तर मेण्याबगैर कधी पडलो नाय आन् आता या निजामानं वाडाबी ठेवला नाय. सारं खणून लुटून नेला. ये बघ ! ये दोन देव राहिले, ते तुला देऊन टाकावे म्हटलं, म्हणजे मराया तरी मोकळी झाले बघ. आता जगून तरी काय करायचं हाय ?

"कर्मानं पोरं नेली, कुकू नेलं, वाडा बी गेला, म्हातारपणी अब्रू जायाची येळ आली, आता कशापायी जगायचं तूच सांग ?"

म्हातारीला बोलता बोलता दम लागला. माधवराव सुन्न होऊन सगळं ऐकत होते. त्यांच्या

डोळ्यासमोरून झर्‌कन राम, धर्मराज, शिवाजी यांचा इतिहास सरकला. ज्या ज्या राजांनी सामान्य मानवाची दुःखे समजावून घेऊन ती हलकी करण्याचा प्रयत्न केला तेथे मानवतेची प्रतिष्ठा राखली गेली. मानवतेची मान उंचावली. मलाही तेच करायला पाहिजे. एक आवंढा गिळत ते म्हणाले -

"आई ! असं का म्हणता ? देवाला दोष देऊ नका. आपल्या नशिबात जे होतं ते होऊन गेलं. पण आता जे होणार आहे ते आपल्याच हातांत आहे. आई! मला तुमचाच मुलगा समजा आणि पुढचे दिवस माझ्याकडे पाहून आनंदाने घालवा. मी आज तुमच्याकडे येईन. तुमचे झालेले नुकसान पाहीन. तुमचा वाडा पूर्वीपेक्षा चांगला होईल. काही काळजी करू नका."

"लेका ! लई गुणाचा हायस रे बाबा ! असा पेशवा म्या तरी पघीतला नव्हता. देव तुला उदंड आउक्ष आणि कीर्ती देईल !"

माधवरावांनी एका शिपायाला खूण केली. त्याने पुढे येऊन मुजरा केला. माधवराव म्हणले,

"एक मेणा घेऊन ये आणि त्यांना घरी पोहोचव."

माधवरावांचे हे वागणे पाहून अनेक लोक पुढे

आल. सगळ्यांना आपलं नुकसान सांगितलं. प्रत्येकाला आपापली नुकसान भरपाई मिळेल असं आश्वासन दिलं गेलं. हे ऐकून इतका वेळ कसे तरी गप्प बसलेले बापू पुन्हा माधवरावांना म्हणाले,

"श्रीमंत ! जे व्हायचं ते होऊन जातं. पण जर साऱ्यांना नुकसान भरपाई दिलीत तर खजिना अपुरा पडेल."

"बापू ! आमच्या चुकीचं हे प्रायश्चित्त आम्हांला घेतले पाहिजे."

"पण श्रीमंत, आपली तर यात काहीच चूक नाही."

"नाही कशी ? आम्ही प्रजेचं रक्षण करू शकलो नाही. राजाचं हे पहिलं कर्तव्य आहे. ते जर करता आलं नाही तर राज्याची जबाबदारी अंगावर घेऊ नये. बापू ! तुम्हाला माहीत असेल की, नारदानं एकदा धर्माला प्रश्न विचारला होता, "राजा ! तुझ्या चुकीमुळे जर प्रजेचं नुकसान झालं तर ते तू तीन दिवसांत सरकारी तिजोरीतून भरून देतोस ना ?" आम्हालाही तसंच धर्मराज्यच करायचे आहे. इतके दिवसांतच आम्हाला त्याची दखल घ्यायला पाहिजे होती पण आम्ही इथे नव्हतो. घटकाभर ते सोडून दिलं तरी आज निजामाच्या अमानुष अत्याचाराने माणसांना माणूस म्हणून जगता येत नाही. निदान मानवतेकरिता

तरी आम्हाला त्यांचं नुकसान भरून द्यायलाच पाहिजे. बापू ! अशा स्थितीत हिऱ्यामोत्यांचे दागिने अंगावर घालून मिरवण्यापेक्षा या प्रजेला सुखी केलं तर त्यांचे आशीर्वाद तरी मिळतील. आणि हे करीत असताना हर्षवर्धनासारखा संपूर्ण कोश रिकामा करून दारिद्र्य आलं तरी चालेल. तीच आमच्या आयुष्यातील महत्त्वाची कमाई आहे.''

क्षणभर त्यांनी लोकांच्याकडे पाहिले आणि परत बापूंना म्हणाले,

''बापू ! ऊन वाढत आहे. आता आम्ही जास्त वेळ इथं थांबत नाही. पण आत्ताच्या आत्ता शहरात दवंडी पिटवा की, आज दुपारी आम्ही नगर प्रदक्षिणा करणार आहोत. प्रत्येकाने आपापले नुकसान सांगावे. सगळ्यांचे नुकसान भरून दिले जाईल. नाना ! सगळ्यांच्या नुकसान-भरपाईच्या याद्या तयार करा. आणि कोणत्याही परिस्थितीत तीन दिवसांत सगळ्यांची नुकसान भरपाई करून देण्याची व्यवस्था करा.'

नानांनी आणि बापूंनी होकार दिला. त्याचा स्वीकार करीत माधवराव उठले आणि पुन्हा शनिवारवाड्याच्या पायऱ्या चढू लागले.

※

# विद्याव्रती

''पुढे काय करावं ?. शिकावं की नोकरी करावी ?'' नुकत्याच मॅट्रिक पास झालेल्या विठ्ठलपुढे प्रश्नचिन्ह उभे राहिले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची. वडील थकलेले. कामधंदा नाही. मदत मिळणार कशी ? आईने तर स्पष्टच सांगितले,

''विठू, अरे इतका शिकलास, पुरे झालं बाबा तुझं शिकणं. आता कुठे तरी नोकरी लागेल ती कर आणि आपला सुखात राहा.''

''करावी नोकरी ? आई वडिलांना दोन घास सुखानं तरी खाता येतील. शिकून तरी काय नोकरीच करायची ना ? मग आताच नोकरी करायला काय हरकत आहे ? आईला बरं वाटेल.'' एका मनाने सांगितले, तोच दुसऱ्या मनाने अडवीत म्हटले, ''आईला बरं वाटेल पण उच्च शिक्षणाचं माझं ध्येय ? आर्थिक संकट आलं म्हणून ते सोडून द्यायचं ? वेगळ्या वाटेने जाताना

अडचणी यायच्याच पण त्यासाठी शिकण्यातला आनंद गमवायचा ? अन् चार-पाच वर्षांचा तर प्रश्न ! उच्च शिक्षणाचं ध्येय नाही सोडायचं. कितीही अडचणी आल्या तरी ते पूर्ण करायचंच !!'' विचार-मंथनातून विचार पक्का झाला आणि एके दिवशी ते आईला म्हणाले,

''आई, मी पुढे शिकायला पुण्याला जाणार आहे.''

''आता काय करायचंय शिकून ! झालं एवढं पुरं नाही का ?''

''नाही. मला खूप शिकायचंय. मोठं व्हायचंय! आई खरं म्हणजे तू मला आनंदाने निरोप द्यायला हवा. मला आशीर्वाद द्यायला हवा, पण तू तर मला मागे ओढते आहेस. आई, मला पुण्याला जाऊ दे ! मी शिकेन, खूप शिकेन. विश्वास ठेव माझ्यावर.''

''अरे बाबा, तुझं सारं ठीक आहे. पण तिथं आपली ना ओळख ना पाळख ! बरं, आपल्याजवळ नाही पैसा. 'इकडचं' कसं चालतं हे तुला माहीत आहेच. मग तिथं तू काय करणार आणि कसा शिकणार ?''

''आई, तूच मला लहानपणी गोष्टी सांगायचीस ना की, चांगलं काही करायचं असलं की कितीही संकटं

आली तरी डगमगू नये. डोळ्यांसमोर मोठं ध्येय ठेवावे. ते गाठण्याचा प्रयत्न करावा.

मोठं ध्येय ठेवून त्यात अपयश येणं हे ध्येयशून्य जीवनापेक्षा केव्हाही श्रेष्ठच आहे. हिमालयावर ठेच लागून पडणारा माणूस हा जमिनीवरून ताठपणाने चालणाऱ्या माणसापेक्षा उंचावरच असतो. माणसाने प्रयत्न करावेत. यश मिळतंच.''

''हो, खरं आहे बाबा ते, पण.......''

''आता पण कसला ? ध्रुवाची गोष्ट तूच सांगितली होतीस ना ? त्याचं अढळपद प्राप्तीचं ध्येय किती मोठं, भव्य होतं. अनेक संकटांना तोंड देऊन त्याने ते प्राप्त केलेच ना ? मग मी ही तसंच करीन. संकटांना तोंड देईन. काबाडकष्ट करीन आणि माझं ध्येय मी पूर्ण करीन.''

त्यांच्या आईला या सगळ्या प्रश्नांना पटतील अशी उत्तरे देता येणे कठीण होते. तथापि मातृप्रेमामुळे ती म्हणाली.

''विठू त्या सगळ्या पुराणातल्या गोष्टी आहेत. साऱ्याच का खऱ्या असतात ?''

''आई उदात्त आणि मोठी तत्त्वं आपल्या जीवनात आचरायची असतात म्हणून तर आम्ही श्रेष्ठ लोकांचं जीवन डोळ्यांसमोर ठेवतो. आई, तू

सांगितलेल्या कथेतील ध्रुव, एकलव्य, कृष्ण, शिवाजीमहाराज हे माझे आदर्श आहेत. ते ध्येयनिष्ठ जीवन जगले आहेत. त्यांनी अनेक संकटांना तोंड देऊन विजय संपादन केला आहे. संकटांना तोंड देण्यातच खरा पुरुषार्थ असतो. मी त्यांच्याप्रमाणे खडतर तपश्चर्या करण्यास तयार आहे. अग, कष्ट करण्याची तर मला सवय आहेच आणि संकटं तर आपली परीक्षाच बघत असतात, आई तुला आठवतो तो प्रसंग!...

"कोणता रे ?"

"त्या दिवशी घरात सरपण नव्हतं. बाबा घरातच बसले होते पण तू त्यांना सांगितलं नाहीस. मला बोलावलं. मी हातातलं पुस्तक टाकून धावत तुझ्याकडे आलो आणि विचारलं-

"काय आई ?"

तू सांगितलं,

"विठू, सरपण आहे का बघ रे. अंगणात वगैरे असेल कोठेतरी."

मी खूप शोधलं पण मला सापडलं नाही. शेवटी नाईलाजानं मी तुला विचारलं -

"आई, कोठेच सरपण सापडत नाही ग ! आपल्या मोडक्या खोल्यांचे वासे आणू का ?"

तुझे डोळे एकदम अश्रूंनी भरून आले. त्याच स्थितीत मानेनंच तू मला परवानगी दिलीस आणि म्हणालीस, 'देवा ! किती अंत पाहणार आहेस. चिमण्याराजांना पोटभर खायला सुद्धा देता येत नाही. का असा माझा छळ करतोस ?' ते शब्द तू अगदी अस्पष्ट म्हटले होतेस, पण मी ते ऐकले होते. मलाही खूप वाईट वाटलं तरी त्यावेळी मी काय करणार होतो?

त्याच दिवशी मला शाळेत दरमहा एक रुपयाची स्कॉलरशिप मिळाली. किती आनंद झाला मला त्यावेळी ! मी तो रुपया लगेच तुला आणून दिला. त्यावेळी तू मला छातीशी कवटाळून म्हणालीस,

''विठू, शहाणा आहे बाळ. देव तुला चांगली बुध्दी देईल.''

''आई ! तो प्रसंग तू विसरली असशील, पण मी कसा विसरेन ? तुझ्या इच्छेप्रमाणेच मी पुढे शिकायला जात आहे. मग जाऊ ना मी ? देणार ना मला आशीर्वाद ?''

''मोठा गोड बोलतोस बघ तू. तूझं बोलणं ऐकलं की नाही म्हणताच येत नाही बघ ! बरं, जा. यशस्वी होऊनच ये.''

त्यानंतर लगेचच विठ्ठलराव पुण्यास यायला निघाले. जाण्यापूर्वी त्यांनी आपले शिक्षक श्री.

वासुदेवराव चिरमुले यांना आपल्या निश्चयाबद्दल सांगितले. आपुलकीने चौकशी करून त्यांनी विठ्ठलरावांना योग्य मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले,

''पुण्याला जा. तिथं 'डेक्कन मराठा एज्युकेशन सोसायटी' आहे. त्यांच्यातर्फे गरीब होतकरू मुलांना शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळते. श्री. म्हस्के नावाचे कोणीतरी गृहस्थ त्याचे प्रमुख आहेत. त्यांना भेटून तुझी सारी परिस्थिती सांग. ते तुला निश्चित मदत करतील.''

विठ्ठलरावांना प्रकाशाचा तेवढाच एक किरण होता. बाकी सगळीकडे अंधार होता. त्यांना पुण्याचे दर्शन दुसऱ्यांदा घडत होते. मॅट्रिकच्या परीक्षेच्या वेळी ते प्रथम पुण्यात आले होते, पण त्या वेळी पाच-सहा दिवसच ते होते. त्यावेळी संपूर्ण पुण्याचे दर्शन घडलेच नव्हते म्हणून खऱ्या अर्थाने पुण्यासारख्या शहरात ते प्रथमच आत्ता राहणार होते.

पुण्याच्या घडलेल्या पहिल्याच दर्शनाने ते भांबावले. घाबरले. बावरले. तरीही प्राप्त परिस्थितीत पुढे जाणे भागच होते. त्यांच्या शिक्षकाच्या ओळखीने त्यांना सदाशिव पेठेत फडतऱ्यांच्या वाड्यात राहाण्यास जागा मिळाली. जागेचा प्रश्न सुटला तरी इतर प्रश्न उभे होतेच ! पुण्यात शिक्षणासाठी राहावयाचे म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. कॉलेजची फीच दरमहा पाच रुपये

होती. खानावळ पाच रुपये आणि इतर खर्च ! इतके पैसे जमा करायचे कसे ? विठ्ठलरावांनी यावर बराच विचार केला. परिस्थितीने गांजलेला गरीब माणूस विचार करण्यापलीकडे काहीच करू शकत नाही. त्यांच्या डोळ्यासमोर फक्त म्हस्केसाहेबांचेच नाव तरळत होते.

दुसऱ्याच दिवशी सकाळी त्यांनी म्हस्केसाहेबांचा पत्ता शोधून काढला. ते लष्करात राहात होते. म्हस्केसाहेब म्हणजे त्या वेळचे एक बडे प्रस्थ होते. नामांकित वकील म्हणून त्यांची प्रसिद्धी तर होतीच पण शिक्षणाला मदत करणारा एक दिलदार मराठा गृहस्थ अशी ख्यातीही त्यांनी मिळविली होती. एवढ्या मोठ्या गृहस्थास भेटण्याचा विठ्ठलरावांच्यावरचा हा पहिला प्रसंग होता.

बंगल्यात पाऊल टाकल्यावरच त्यांच्या रूबाबदार आणि श्रीमंत राहणीची जाणीव त्यांना झाली. विठ्ठलरावांनी त्यांच्या दिवाणखान्यात पाऊल टाकले. तेथले फर्निचर, उंची वस्तू, गालीचे आणि बसण्याच्या अद्ययावत् पद्धतीच्या खुर्च्या हे सर्व पाहून त्यांचे डोळे दिपून गेले.

श्रीमंतीच्या झगमगाटापुढे गरिबी न कळत मान तुकविते. ते तेज तिला सहन होत नाही.

म्हस्केसाहेब आपल्या दिवाणखान्यात विलायती चिरूट ओढीत बसले होते. चिरूटातून निघणाऱ्या धूम्रवलयाकडे पहात कसला तरी विचार ते करीत असावेत. मधून मधून त्यातली राख ते समोरच्या टेबलावरच्या रक्षापात्रात झटकत होते आणि पुन्हा त्यांचा कार्यक्रम सुरू करीत होते. ती मूर्ती पाहिल्यावर विठ्ठलरावांच्या मनात अनेक विचार येऊन गेले. मनाचा हिय्या करून त्यांनी म्हस्केसाहेबांना नमस्कार केला. त्यामुळे त्यांची तंद्री भंग पावली. नमस्काराचा स्वीकार करीत त्यांनी विचारले -

"कोण ? कोठला तू ?"

"माझं नाव विठ्ठल शिंदे. जमखिंडीहून कॉलेजच्या शिक्षणाकरिता आलो आहे."

"बरं मग ? माझ्याकडे काय काम आहे ?"

इतकं तुटक बोलल्यानंतर आपलं काम आणि आपल्या अडचणी सांगाव्यात किंवा नाही ? सांगितलं तर काम होईल का ? अशा अनेक शंका त्यांच्या मनाला भेडसावू लागल्या. तरीही त्यांनी सांगितलं -

"मी गरीब आहे. शिक्षणाकरिता काही मदत मिळाली तर....."

"वडील आहेत का ?"

"होय."

"काय करतात ते ?"

"जमखिंडीलाच कारकून होते. आता घरीच असतात. सध्या ते काहीच करीत नाहीत."

"अरे, मग शिकण्यापेक्षा नोकरी करीत नाहीस? अनायसा तू मॅट्रिक पास आहेसच, नोकरी लावून देऊ का ? आज तुझ्या वडिलांना तुझ्या शिक्षणापेक्षा नोकरीची आवश्यकता असेल ! म्हणत असशील तर नोकरी देतो."

"मी जमखिंडीहून शिक्षणाकरिता येथे आलो आहे. नोकरीकरिता नाही. पुढे शिक्षण घ्यायचं हे माझं ध्येय आहेच. ते साध्य करण्याकरिता आपण मदत दिलीत तर ती फक्त हवी आहे. नाही तर मी माझं ध्येय पूर्ण करणार आहेच."

"शाब्बास ! मग तुझ्यासारख्या मुलांना निश्चितच मदत मिळेल. काय शिकायची इच्छा आहे?"

"आर्टस् कॉलेजमध्ये जाऊन बी. ए. होणार आहे आणि पुढे वकील होण्याची इच्छा आहे."

"ठीक आहे. दरमहा दहा रुपये स्कॉलरशिप मिळेल. दरवर्षी पास झाले पाहिजे एवढी अट मात्र ध्यानात ठेव."

जास्त चवकशी नाही. आपुलकी नाही. फार

आस्था नाही. एकदम निर्णय ! घटकान् घटका आपुलकीनं चौकशी करणाऱ्या खेडेगावातल्या माणसांच्यापेक्षा त्यांना हा प्रसंग अगदीच नवीन होता. जास्त बोलणे शक्य नव्हते. नाहीतर मिळालेली स्कॉलरशिप रद्द व्हायची. ते काहीही न बोलता घरी येण्याकरिता निघाले.

रस्त्यातून घरी जात असताना पुन्हा विचारांनी त्यांना ग्रासले. दहा रुपयांत महिना भागणार कसा ? पुष्कळ विचार केल्यानंतर त्यांना एक उपाय सुचला. त्यांनी ठरविले की, कॉलेजचे प्राचार्य आगरकर यांची उद्या सकाळीच भेट घ्यायची. त्यांना सारी हकीगत सांगून कॉलेजची फी माफ करण्याचा प्रयत्न करायचा. आत्तापर्यंत एवढं जमलं आहे, तेव्हा ही एकच गोष्ट जमली तर मग निर्वेधपणे शिकता येईल.

दुसऱ्या दिवशी सकाळीच त्यांचे पाय प्राचार्य आगरकरांच्या घराकडे वळले. फर्ग्युसन कॉलेजच्या आवारातच ते राहात होते. अंगणात सकाळचे ऊन घेत बसले असतानाच विठ्ठलराव आत आले. अदबीनं समोर उभं राहून त्यांना नमस्कार करून फी माफीचा अर्ज त्यांनी त्यांच्यापुढे केला. आपल्या खोल गेलेल्या पण भेदक नजरेनं त्यांनी प्रथम विठ्ठलरावांच्याकडे आणि मग त्या अर्जाकडे दृष्टी टाकली. आणि विचारले-

"तुला स्कॉलरशिप मिळते ना ?"

''होय सर.''

''मग तुझी फी माफ होणार नाही.''

''सर, पण मी गरीब आहे. माझ्याकडे फीपुरतेही पैसे नाहीत.''

''ज्यांना स्कॉलरशिप मिळते त्यांना नियमाप्रमाणं फी माफ करता येत नाही. मी काहीच करू शकत नाही.''

विठ्ठलरावांचा नाईलाज झाला. आशेचा तंतू तुटला. जे घडावं असं वाटत होतं ते घडलं नाही. पुन्हा निराशा ! काय करावं हा प्रश्न पुन्हा उभा राहिला होता. ध्येयनिष्ठ लोकांना संकटांच्या काटेरी मार्गावरूनच चालावं लागतं. शांतपणे ते खोलीवर आले.

अशा परिस्थितीत एखादा सामान्य माणूस असता तर त्यानं हे सारं टाकून घरचा रस्ता धरला असता. विठ्ठलरावांनी विचार केला.

''आपण एका निश्चयाने, ध्येयाने प्रेरित होऊन पुण्यात पाऊल टाकले आहे. अपयशाने खचून जाण्याकरिता नाही. काय वाटेल ते झालं तरी शिक्षण सोडायचं नाही. संकटांच्या आपत्ती आल्याशिवाय सद्गुणांची संपत्ती उजळत नसते.

दहा रुपयांत महिना काढायचा म्हणजे काटकसर आवश्यक होती. पैकी पाच रुपये फीचे निश्चितच

जाणार होते. राहता राहिली खानावळ ! विठ्ठलरावांनी विचार केला, ''खानावळीत जाण्यापेक्षा हातानेच स्वयंपाक केला तर रुपया-आठ आण्यांची बचत होईल.'' म्हणून खानावळीत जाण्याऐवजी त्यांनी घरीच हाताने स्वयंपाक करण्यास सुरुवात केली. अशा स्थितीत त्यांचं कॉलेजचं शिक्षण सुरू झाले. कॉलेज जीवन सुरू झाले.

कॉलेज जीवन ! किती रम्य कल्पनांची पखरण त्या जीवनाभोवती गुरफटलेली असते. शाळेच्या चौकटबद्ध जीवनातून मुक्त होऊन मोकळ्या वातावरणात स्वैर संचार करायला लावतं ते कॉलेज जीवन ! कल्पनेवर आरूढ होऊन स्वप्नाळू जगात विहार करायला शिकवतं ते कॉलेज जीवन ! ''काव्यमय जीवन'' जगण्याचं ध्येय डोळ्यांसमोर ठेवायला लावतं ते कॉलेज जीवन ! फुलपाखरांच्या सारिखं विविध रंग लेवून कळ्या-फुलांच्या संगतीत, अनेक रंगांची लज्जत चाखण्याची स्वप्नं डोळ्यांपुढं तरळत ठेवतं ते कॉलेज जीवन ! कोणाचंच बंधन नसलेलं जीवन जगायला सांगतं ते कॉलेज जीवन !!

पण हे कॉलेज जीवन श्रीमंत लोकांच्याकरिता असतं. मौजेने कॉलेजच्या पायऱ्या चढणाऱ्या गुलहौशी तरुण-तरुणींच्याकरिता असते. विद्येच्या खऱ्या उपासकांना मात्र तेच कॉलेज जीवन वेगळी जाणीव

करून देते. साऱ्या जीवनात निराळाच अर्थ भरते. तेच कॉलेज जीवन पण किती वेगळे वाटते त्यांना ? त्यांना वाटते -

"छोट्या जीवनातून विशाल जीवनात नेऊन सोडतं ते कॉलेज जीवन ! मनाच्या कंगोऱ्यांना घासून पुसून उदात्ततेचा आकार देतं ते कॉलेज जीवन ! खऱ्या अर्थानं स्वतंत्र शिक्षण घेण्याचं शिक्षण देतं ते कॉलेज जीवन ! ग्रंथालयाचा मनसोक्त उपयोग करून देऊन विचारांचं भांडार मुक्त हस्ताने लुटायला लावतं ते कॉलेज जीवन ! श्रेष्ठ लोकांच्या सहवासात व्यक्तिमत्त्वाची विशिष्ट ध्येयानं जडण घडण करतं ते कॉलेज जीवन ! उत्तुंग विचारांनी आणि भावनांनी भविष्यकाळाची स्वप्नं सतत डोळ्यासमोर तरळत ठेवतं ते कॉलेज जीवन ! व्यक्तीची सर्वांगीण उन्नती करून समाजनिष्ठेचे आणि राष्ट्रनिष्ठेचे ध्येय फुलवितं ते कॉलेज जीवन !!"

विठ्ठलरावांचे कॉलेज जीवन हे असे होते.

दिवसामागून दिवस जात होते. वर्ष संपत आले. परीक्षेचे वेध लागले. त्या वेळी सर्व परीक्षा विद्यापीठाच्या असत. परीक्षा म्हटलं की फॉर्म फी आलीच. प्रिव्हीयसची फॉर्म फी वीस रुपये होती. फक्त दहा रुपये स्कॉलरशिपच ज्याला मिळू शकते, ज्याचे दरमहाचे उत्पन्न तेवढंच होते. त्याने वीस रुपये कोठून आणायचे ? स्वस्ताईच्या काळात वीस रुपये देणार तरी

कोण ? पुन्हा संकट ! जो संकटांना सामोरा जायला तयार असतो, त्याचा पिच्छा पुरविण्यात संकटांनाही आनंद वाटत असावा का ? आता या संकटाला सामोरे तरी कसे जायचे ? माघार घ्यायची नाही हे तर निश्चित ठरलं आहे. पण रस्ता तरी कसा शोधायचा ?

विठ्ठलराव घरात विचार करीत बसले होते.तोच नेहमी येणारे नरहरपंत नावाचे एक ब्राह्मण त्यांच्या खोलीत आले. सतत येण्याजाण्याने नरहरपंत त्यांच्या चांगल्याच ओळखीचे बनले होते. एक मराठ्याचा मुलगा एवढे काबाडकष्ट करून शिकतो आहे याचं त्यांना मनापासून कौतुक वाटत असे. चांगल्या गोष्टी कोणी करीत असेल तर मग त्या कोणत्याही जातीत असोत, धर्मात असोत, आपल्याला त्याच्याबद्दल आनंद वाटला पाहिजे. कौतुक वाटलं पाहिजे. नरहरपंत विठ्ठलरावांचे खरे मित्र बनले होते. विठ्ठलरावांच्या आनंदाने त्यांच्याही चेहऱ्यावर आनंद खुलत असे. आणि त्यांच्यावरच्या संकटाने, दुःखाने नरहरपंतांच्या डोळ्यांत अश्रू तरळत असत. विठ्ठलरावांची सारी हकीगत त्यांना कळली. थोडासा विचार करताच त्यांना मार्ग सापडला. ते म्हणाले.

''विठू ! रा. ब. नवलकर माझ्या ओळखीचे आहेत. त्यांची आपण भेट घेऊ. ते तुला जरूर मदत करतील.''

"म्हणजे पैशाकरिता हात पसरायचे ? भीक मागायची ?"

"अरे विद्येसारख्या पवित्र कामाकरिता भीक मागण्यास काहीच हरकत नाही. आमची ब्राह्मणांची मुले नाही का मधुकरी मागून शिकत.

विद्यार्थ्याने विद्यार्जनाकरिता कोणतेही काम करायची, प्रसंगी भीक मागायची वेळ आली तरी लाज धरू नये. चल मी येतो तुझ्याबरोबर."

विठूचे मन त्यांनी कसे तरी वळविले आणि रा. ब. नवलकरांची भेट घेऊन त्यांना सारी हकीगत सांगितली. त्यांनी दोन रुपयांची मदत व एक चिठ्ठी लिहून दिली. आपल्या काही मित्रांची नावे सांगितली. विठ्ठलराव व नरहरपंत हे दोघे पैशाकरिता उन्हातान्हात भटकत होते. रुपया-रुपयाने त्यात भर पडत होती. आणि एकाएका दिवसाने पैसे भरण्याची मुदत कमी होत होती. चार दिवस राहिले. आठ रुपये जमले. दोन दिवस राहिले. बारा रुपये जमले. चौदा रुपये झाले. फक्त सहा रुपये पाहिजे होते. फक्त सहा रुपये ! दिवस राहिला होता फक्त एक ! उद्या पैसे भरायचे. सहा रुपये जमणार कसे ?

नरहरपंतांनी सांगितले - "तुझ्याजवळ रा. ब. नवलकरांची चिठ्ठी आहेच. तू डॉ. शेळक्यांच्याकडे जा.

ते मराठा समाजातले प्रख्यात डॉक्टर आहेत. श्रीमंत आहेत. त्यांच्याच जातीचा एक मुलगा एवढ्या संकटांना तोंड देऊन शिकतो आहे हे पाहिल्यावर त्यांना कौतुक वाटेल आणि मला वाटतं तुझी राहिलेली सगळी रक्कम पूर्ण होईल.''

विठ्ठलरावांनी अखेरचा प्रयत्न म्हणून त्यांचं म्हणणं ऐकलं. ते डॉ. शेळक्यांचेकडे गेले. रा. ब. नवलकरांची चिठ्ठी त्यांना दाखविली. डॉ. शेळक्यांनी ती चिठ्ठी वाचली. विठ्ठलराव त्यांच्या चेहऱ्याकडे बघत होते. चंद्राच्या शीतलतेच्या अपेक्षेने ते आले होते आणि अनपेक्षितपणे त्यांच्यावर वर्षाव झाला जळत निखाऱ्यांचा ! ते एकदम कडाडले,

''मराठ्यांच्या कुळात जन्माला येऊन पैशाकरिता भीक मागत हिंडण्याची लाज नाही वाटत ? जवळ पैसे नसताना शिकावे कशाला ? गुरे का वळत नाहीस ? चल जा चालता हो इथून....''

उकळत्या तेलाप्रमाणे ते शब्द विठ्ठलरावांच्या कानात घुसले. अपमानाच्या शब्दांच्या असंख्य इंगळ्या त्यांच्या मनाला डसल्या. दवाखान्याच्या पायऱ्या भराभरा उतरून त्यांनी खोलीचा रस्ता धरला. अत्यंत अस्वस्थ मनाने ते खोलीवर आले.

डोके सुन्न झाले होते. काय करावे काही कळत

नव्हते. एकदा वाटले, 'नको ते शिक्षण अन् नको हा ताप ! सरळ उठावं आणि जावं घरी' तोच दुसरे मन म्हणाले,

''वा....! चांगला विचार आहे ध्येयमार्गावरून परत फिरायचे होते तर आला होतास कशाला पुण्याला ? त्या वेळी......

''त्या वेळी मारे दिमाखात आईला सांगितलं होतंस ना की, ''मी काय वाटेल ते कष्ट करीन, पण माझं ध्येय पूर्ण करीन. ध्रुव, एकलव्य, शिवाजीमहाराज हे माझे आदर्श आहेत. ते ध्येयनिष्ठ जीवन जगले आहेत. संकटांना तोंड देऊन ते यशस्वी झाले आहेत.'' मग आता एवढ्याशा संकटाने डगमगलास ? ध्रुव ताऱ्यासारखा अढळ राहण्याचा निश्चय केलास आणि एका फुंकाऱ्याने ढळलास ? आपली कुवत नव्हती तर एवढं तत्त्वज्ञान आईला सांगितलंस तरी कशाला ? आता जर जमखिंडीला परत गेलास तर आई काय म्हणेल ? आई तुझं स्वागत करील काय ? आपला मुलगा संकटांना घाबरून परत आला आहे, हे कळल्यावर तिला दुःख होईल. ''यशस्वी होऊनच ये.'' हे तिचे शब्द तू पुरे केले नाहीस. या साऱ्या गोष्टींचा नीट विचार कर आणि काय करायचं ते ठरव !''

ढग विरू लागावेत, आकाश निरभ्र व्हावं तसे

निराशेचे ढग विरून जाऊन मन स्वच्छ होऊ लागलं. भावनावेग कमी होऊ लागला. त्याची जागा विचाराने घेतली. भावनेच्या प्रबल ओघात विचार बुडून जातात, पण तो ओघ मंदावला लव्हाळ्याप्रमाणं डोकं वर काढून ते आपला प्रभाव मनावर गाजवू लागतात.

विठ्ठलरावांचा ढळलेला तोल पुन्हा सावरला. चुकलेला ताल परत जुळला. नव्य निश्चयाने ते नवा मार्ग शोधणार तोच दार खटखटले त्यांनी आनंदानेच दार उघडले. पाहतात तो त्यांचा बालमित्र विष्णुपंत देशपांडे ! त्यांना आश्चर्यच वाटले. त्यांनी त्याला आत बसायला सांगितले. बोलायला सुरुवात करण्यापूर्वीच त्याने वीस रुपये काढले आणि विठ्ठलरावांचे समोर ठेवून तो म्हणाला -

''विठू ! तुझी अडचण तुझ्या वहिनीला, नव्हे तुझ्या बहिणीला समजली आणि तिला मिळालेली भाऊबीज घेऊन तिनं मला तुझ्याकडे धाडलं. हे वीस रुपये घे आणि तुझी परीक्षेची फी भर.''

विठ्ठलरावांचे डोळे एकदम पाणावले. अश्रू वाहू लागले. जगात ज्याला कोणी नाही त्याचं रक्षण करणारा परमेश्वर असतो, हे त्यांना मनोमनी पटलं. डॉ. शेळके आणि विष्णू देशपांडे ! दोन व्यक्ती त्यांच्या डोळ्यांपुढे पटकन् उभ्या राहिल्या. एक त्यांच्या जातीचा असून त्यांच्या ध्येयावर निखारे ठेवणारा आणि दुसरा

दुसऱ्या जातीतला असून त्यांच्या उरापोटी बाळगलेल्या ध्येयाला खतपाणी घालून फुलविणारा ! सहज त्यांच्या मनांत आलं, ''मनाचा चांगुलपणा, थोरपणा हा जातीवर अवलंबून नसतो. तो मनाच्या घडणीवर, सुसंस्कारावर अवलंबून असतो. संस्कारक्षम मनं विशिष्ट जातीतच जन्माला येतात असं नाही.''

विठ्ठलरावांच्या मुखातून शब्द उमटेनात तरीही ते म्हणाले-

''विष्णू ! दिव्यातलं तेल संपताना एखाद्यानं अकस्मात् त्यात तेल घालावं, तसं तू केलं आहेस. मी पैसे जमत नव्हते म्हणून किती निराश झालो होतो, पण आता माझी काळजी निवारण झाली. किती चांगले लोक आहात रे तुम्ही ! जन्मभर तुमची सेवा केली तरी उपकार फिटायचे नाहीत. एवढंच काय पण माझ्या कातडीचे जोडे शिवून तुम्हांला घातले तरी ॠण फिटायचे नाही बघ !''

''विठू, काय बोलतोय हे ?''

विठ्ठलरावांनी पैशाचा स्वीकार केला. परीक्षा झाली. रिझल्ट लागला. यशश्रीने त्यांना माळ घातली. एवढ्या कटकटीने त्यांच्या हातात पहिले वर्ष पडले.

पुढच्या वर्षाकरिता विठ्ठलराव पुण्याला आले. आर्थिक अडचण सहन करायची कशीतरी सवय लावून

घेतली होती, त्यामुळे सुरुवातीचे काही दिवस ठीक गेले. तसेच सारे दिवस गेले असते तर त्यांची कसोटी कशी लागली असती असती ? टाकीचे घाव सोसल्याशिवाय देवपण नसते का आले ? मुशीत घातल्याशिवाय सोने उजळून निघाले नसते का? तसं व्हायचं नव्हतं. जीवनाचा प्रवाह संथ वाहू लागला तर जीवनातली मजाच संपते. संकटांची तोंडीलावणी असल्याशिवाय जीवन रूचकर होत नाही.

विठ्ठलरावांची बहीण जनाक्का हिचा सासरी अतोनात छळ होत होता. ती शिकलेली होती हाच तिचा दोष ! तिचा नवरा आणि सासू दोघंही तिला गुरासारखं मारीत असत. हे जेव्हा त्यांना समजलं तेव्हा त्यांना अन्नपाणी गोड लागेना. तिला त्या जाचातून सोडविणे भाग होते. पण घरी तरी कशी आणणार ? जमखिंडीला वडिलांना नोकरी नाही आणि पुण्याला तर स्वतःचेच खाण्यापिण्याचे हाल ! अशा स्थितीतही त्यांनी तिला पुण्याला आणलं. शाळेत शिक्षण देण्याचं मनाशी ठरवून त्या दृष्टीने त्यांनी प्रयत्न केला. योगायोगाने मिस् मेरी भोर यांच्या मदतीनं हुजूरपागेत तिला प्रवेश मिळाला. त्याचबरोबर मराठा मुलींच्याकरिता असणारी दरमाह दहा रुपयाची स्कॉलरशिपही तिला मिळाली. तिचा प्रश्न सुटला. आर्थिक अडचण थोडी दूर झाली. क्षणभर आलेलं वादळ शमलं. प्रवाह पूर्ववत् शांतपणे वाहू लागला.

मग विठ्ठलरावांनी आई आणि पत्नी यांनाही पुण्याला आणलं. पैशाची नेहमीची रड होतीच म्हणून शिकवण्या करायला सुरुवात केली. त्याचवेळी त्यांना वाटले की, बडोद्याचे श्रीमंत सयाजीराज गायकवाड हे उदार आणि विद्येचे उपासक आहेत. आपण त्यांच्याकडे गेलो तर निश्चित थोडीफार मदत मिळेल. ते मग बडोद्याला गेले. श्रीमंतांची भेट घेतली. त्यांनी पंचवीस रुपये महिना स्कॉलरशिप मंजूर केली. पण ती मिळताच 'डेक्कन मराठा ऐज्युकेशन सोसायटी'ची स्कॉलरशिप बंद झाली. पूर्वीपेक्षा घर बरे चालायला लागले. मानसिक ताण थोडासा कमी झाला.

अशा स्थितीत दोन वर्षे निघून गेली. बी.ए.चे शेवटचे वर्ष उजाडले. इतिहास आणि कायदा हे आवडीचे विषय त्यांनी घेतले. कायद्यावरची व्याख्याने डेक्कन कॉलेजात होत असत. पैशाअभावी ते कॉलेजला पायीच जात होते. संगमातून होडीने जर गेले तर कॉलेज जवळ पडत होते. विद्येकरिता ह्या विद्येच्या उपासकाने हा सारा त्रास सहन केला.

एके दिवशी व्याख्यान संपवून येताना खूप उशीर झाला. रात्र पडली. होडी बंद झाली. आता परत कसं जायचं ? विठ्ठलरावांनी क्षणभर विचार केला. कपडे काढले. पुस्तके त्यात बांधून ते डोक्याला बांधले आणि पोहत पैलतीराला ते आले.

दिवस असे चालले होते. जात होते. कॉलेजचा अभ्यास संपला घरच्या अभ्यासाचा जोर वाढला. रात्रीचे दिवस होऊ लागले. परीक्षा जवळ आली. अगदी जवळ आली आणि एके दिवशी विठ्ठलरावांची परीक्षा संपली, पेपर्स चांगले गेले. आता लक्ष लागले होते रिझल्टकडे ! तपश्चर्येच्या फळाकडे ! यज्ञाच्या सांगतेकडे ! मुंगीच्या पावलाने तो दिवस जवळ येत होता. उत्सुकता शिगेला पोहोचली होती. आतुरता, अपेक्षा अनेक संमिश्र भावनांचे तरंग मनात उठत होते.



रिझल्ट लागला. विठ्ठलरावांना कायदा या विषयात फर्स्ट क्लासचे मार्कस् मिळाले होते. त्यामुळे ते

फर्स्ट एल्. एल्. बी. ची परीक्षाही पास झाले होते. आनंद गगनात मावत नव्हता. उच्च ध्येयाची ती गोड सांगता होती. हे सगळे घडत होते तोच विष्णू देशपांडे तेथे आला. त्याने विठ्ठलरावांना आनंदाने मिठी मारली. तो म्हणाला,

"शाब्बास विठू ! अखेर तू जिंकलीस, अनेक संकटांना तोंड देऊन तू यशस्वी झालास. आपले ध्येय तू पूर्ण केलंस."

आनंदाश्रूंनी विठ्ठलरावांचे डोळे भरून आले. ते म्हणाले,

"विष्णू ! इमारतीचा पाया तू पक्का केलास म्हणून इमारत पूर्ण होऊ शकली."

"मी काय केलं ? सारी परमेश्वराची कृपा. सारं तोच करीत असतो. ध्येयनिष्ठांची ती कसोटी पहात असतो. आणि यशस्वी झाल्यावर अंतिम यशही तोच देत असतो."

विष्णूने त्यांच्या हातावर पेढा ठेवला आणि त्यांचा निरोप घेतला. विठ्ठलराव त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे तसेच बघत राहिले होते. त्याला थांबवून घेण्याचंही भान त्यांना राहिलं नव्हतं.

*

BVBK-0403002

म. वं. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
बाल वाङ्मय विभाग
क्र. ३००२ दिनांक २०।८।७
विषय बा.वा. क्र. . ...